महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रातील आदिवासी, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रश्न आणि कल्याणाच्या योजना

★


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य

२८ राणीचा बाग, पुणे ४११००१

१९७९–८०

# प्रस्तावना

आदिवासी जमाती अत्यन्त मागासलेल्या आहेत. त्यांची सर्वांगीण उन्नती करून त्यांना इतर लोकांप्रमाणे सामाजिक व आर्थिक जीवन प्राप्त करून देणे शासनाचे कर्तव्य आहे. आदिवासी जमाती कोणत्या, त्या कुठे राहातात, त्यांची लोकसंख्या आणि त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन कसे आहे, त्यांच्या विकासासाठी शासनातर्फे कोणत्या योजना राबविल्या जातात यासंबंधाने संकलित माहिती त्यांच्या पर्यन्त, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या शासकीय व अशासकीय कर्मचारी आणि कार्यकर्त्यांपर्यन्त पोहोचणे जरूरीचे आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत दरवर्षी आदिवासी विभागांत आदिवासी तरूण व तरूणींसाठी नेतृत्व प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यांत येतात. त्यांना आदिवासींना मिळणाऱ्या सवलती व आदिवासी कल्याण योजनांची माहिती देण्यांत येते. या युवकांना लिखित सामुग्री पुरविणे आवश्यक वाटत होते. याच जाणीवेतून सोप्या भाषेत ही पुस्तिका संस्थेनी तयार केली आहे. ही पुस्तिका आदिवासी विभागांत काम करणाऱ्या शासकीय व अशासकीय व्यक्तिंनाही उपयुक्त होईल अशी संस्थेला आशा आहे.

(डॉ. गोविंद गारे)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

## अ नु क्र म णि का


| अ.नं. | विषय | पान क्रमांक |
| --- | --- | --- |
| | **विभाग पहिला** | |
| (१) | महाराष्ट्रातील आदिवासी | |
| (२) | आदिवासींचे सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक जीवन. | |
| | **विभाग दुसरा** | |
| (१) | आदिवासींच्या विकासाचा कार्यक्रम. | |
| | (अ) समाजकल्याण विभाग. | |
| | (ब) आदिवासी कल्याण विभाग. | |
| | (क) आदिवासी अुपयोजना व आदिवासी सहकारी विकास महामंडळ. | |
| | (ड) सरकारी बांधकाम व गृहनिर्माण विभाग. | |
| | (इ) शिक्षण व युवकसेवा विभाग. | |
| | (ई) महसूल व वन विभाग. | |
| | (फ) अन्य सुविधा व विकास योजना. | |
| (२) | योजनेच्या लाभासाठी संपर्क कोठे साधावा. | |
| (३) | आदिवासी जमातीची यादी. | |

## १. महाराष्ट्रातील आदिवासी

महाराष्ट्रात १९७१ जनगणनेनुसार अनुसूचित विभागांत व विभागाबाहेर राहाणाऱ्या आदिवासी जमातीची लोकसंख्या सुमारे ४० लाख असून तिचे अेकूण लोकसंख्येशी प्रमाण ८ टक्के आहे. आदिवासी जमातीत भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी, ठाकूर, गावीत, कोलाम, कोरकू, आंध, मल्हार कोळी, धोडिया, दुबळा, माडिया-गोंड, परधान, पारधी ह्या जमातींचा प्रामुख्याने समावेश होतो. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा सहावा क्रमांक लागतो.

आदिवासी लोक शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण २९.८१ टक्के आहे तर आदिवासींमध्ये हे प्रमाण ७.२१ टक्के आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण आदिवासींमध्ये फारच कमी म्हणजे फक्त १.७५ टक्के आढळून येते. आदिवासी आर्थिकदृष्ट्या फारच मागासलेले आहेत. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. सुमारे ९० टक्के लोक शेतीवर उपजीविका भागवितात. त्यांत ५० टक्के लोक शेती करणारे व ४० टक्के लोक शेतमजुरी करणारे आहेत. शेती व्यतिरिक्त आदिवासी लोक झाडे तोडणे, लाकूड कापणे, कोळसा तयार करणे, चटया - टोपल्या तयार करणे, जंगलातील माल गोळा करणे, गवत कापणे, इत्यादि धंदे करतात. त्यांची रहाणी साधी व गरजा मर्यादित आहेत.

महाराष्ट्र राज्यांत आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्या भागाचे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग दिसतात.

### सह्याद्री विभाग :-

सह्याद्री पर्वताच्या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, या जमातींची वस्ती आढळते. १९६१ मध्ये या विभागात ११.६१ लाख आदिवासी रहात होते. ती संख्या १९७१ ला १५.७ लाखापर्यन्त वाढलेली आहे. महाराष्ट्रातील अेकूण आदिवासी लोकसंख्येच हे प्रमाण ४८ टक्के आहे.

### सातपुडा विभाग :-

सातपुडा पर्वताच्या रांगामध्ये भिल्ल, कोकणा, गावीत, दुबळा, धानका व आंध या जमाती राहतात. १९६१ मध्ये त्यांची लोकसंख्या ८.१२ लाख होती. १९७१ ला ती सुमारे १० लाखापर्यन्त म्हणजे अेकूण आदिवासी लोकसंख्येच्या ३३ टक्के अेवढी आहे. या विभागात औरंगाबाद, नांदेड विभागांतील भिल्ल, राजगोंड, आणि आंध आदिवासींचाही समावेश होतो.

..२

गोंडवन विभाग :-

विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशात विशेषत: अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट विभागांत व चंद्रपूर जिल्ह्याच्या गडचिरोली सिरोंचा विभागांत गोंड, माड्या गोंड, कोरकू, कोलाम, परधान, आंध ह्या जमाती राहतात. १९६१ मध्ये त्यांची लोकसंख्या ४ लाख होती. १९७१ मध्ये ती सुमारे ५ लाखापर्यन्त वाढलेली आहे. अनुसूचित क्षेत्राबाहेर राहणारे सुमारे ७-८ लाख आदिवासी याच विभागांत प्रामुख्याने आहेत.

आदिवासी लोक राहात असलेल्या क्षेत्राची ही ढोबळ विभागणी आहे. त्याऐवजी आदिवासी लोकसंख्येची विभागणी डोंगराळ आणि जंगल विभागात राहणारे आदिवासी व सखल किंवा मैदानी भागात राहणारे आदिवासी अशी केली तर ती अधिक शास्त्रीय होऊ शकेल. आदिवासींचे आर्थिक आणि सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ही विभागणी अधिक उपयुक्त होण्यासारखी आहे. डोंगराळ व जंगलात राहणाऱ्या कोणत्याही आदिवासी जमातीचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रश्न कमी अधिक फरकाने सारखेच आढळतात. त्या उलट सखल किंवा मैदानी भागांत राहणाऱ्या आदिवासींच्या समस्या जवळजवळ सारख्याच असतात.

भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कातकरी, ठाकर, गावीत, कोलाम, कोरकू, ह्या प्रमुख जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रात एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८० टक्के आहे. एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या जमातीतही या जमातीचा प्रथम समावेश होतो.

जिल्हा व जमातवार विभागणी :-

धुळे, नासिक आणि ठाणे या तीन जिल्ह्यांत आदिवासींची वस्ती मोठी (१७.५) लाख आहे. त्याशिवाय चंद्रपूर जिल्ह्यांत २.३१ लाख, यवतमाळ जिल्ह्यांत १.९८ लाख, अहमदनगर जिल्ह्यांत १.४५ लाख, जळगांव जिल्ह्यांत १.२५ लाख, कुलाबा जिल्ह्यांत १.१२ लाख, पुणे जिल्ह्यांत १.८ लाख, रत्नागिरी जिल्ह्यांत एक लाख, अमरावती जिल्ह्यांत ८० हजार, परभणी जिल्ह्यांत ४२ हजार औरंगाबाद जिल्ह्यांत ३२ हजार आदिवासी लोक राहातात.

धुळे, नासिक, ठाणे, अहमदनगर, पुणे, कुलाबा, चांदा या जिल्ह्यांतील काही तालुक्यामध्ये आदिवासींची वस्ती सलग व मोठ्या प्रमाणावर आढळून येते. महाराष्ट्रातील १५ तालुक्यांत आदिवासींचे संख्याधिक्य ५० टक्क्याहून अधिक आढळते.

..३

तर १६ तालुक्यात हे प्रमाण २१ ते ५० टक्के आणि ३३ तालुक्यात ५ ते २० टक्के आढळते.

ठाणे जिल्ह्यांत वारली, कातकरी, ठाकर, कोकणा, आणि महार कोळी या जमातीची वस्ती प्रामुख्याने आढळते, धुळे जिल्ह्यांत भिल्ल, कोकणा आणि गावीत या जमातीची तर अहमदनगर व पुणे जिल्ह्यांत महादेव कोळी, कातकरी आणि ठाकर या जमातीची प्रमुख वस्ती दिसते. कुलाबा जिल्ह्यांत कातकरी व नासिक जिल्ह्यांत महादेव कोळी, कोकणा, भिल्ल ह्या जमाती आढळतात. अमरावती जिल्ह्यांत कोरकू, यवतमाळ जिल्ह्यांत कोलाम व गोंड तर चंद्रपूर जिल्ह्यांत गोंड आणि माडिया गोंड, परधान, हळबा ह्या प्रमुख आदिवासी जमाती आढळतात.

आदिवासी जमाती डोंगराळ भागांत राहतात. त्यामुळे या जमातीचे लोक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांच्या उन्नतीच्या मार्गात अनेक अडचणी येतात. अनुसूचित क्षेत्रांत दळणवळणाच्या सोयी, पिण्याचे स्वच्छ पाणी, पक्की घरे, वैद्यकिय सोयी, शिक्षणाच्या सोयी, इत्यादिचा अभाव आढळतो. आर्थिक पिळवणूक ही त्यांची मुख्य समस्या आहे. त्यांच्या जमिनी सावकार, जमीनदार लोकांनी बळकावून त्यांची सर्वत्र लूट केली आहे. त्यामुळे अनेक आदिवासी शेतमजूर आणि जमिनदारांची कुळे बनली आहेत. त्यांचे मुख्य प्रश्न गरिबी, अज्ञान, आले मागासलेपणा व आर्थिक शोषण, बेकारी, बेरोजगारी हे आहेत. समाजाला पोषक आणि उन्नतीकारक असलेले आदिवासींचे जुने रितीरिवाज यांचा परिपोष करणे व जे जाचक, उन्नतीला विघातक रितीरिवाज आहेत त्यांना उत्तेजन न देता शिकवणीच्या मार्गाने ते निष्प्रभ करणे व त्यांचे आर्थिक शोषण थांबवणे, शैक्षणिक विकास घडविणे हा महाराष्ट्रांतील आदिवासींच्या सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीचा मार्ग होऊ शकेल.

..३

## परिशिष्ट नं. १

### आदिवासी जमाती व जिल्हावार त्यांची लोकसंख्या.

| अ.नं. | आदिवासी जमातीचे नांव | लोकसंख्या | जिल्हानिहाय आदिवासी जमातींची संख्या. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती | २९५४२४९ | - |
| १. | आंध | ७५,१६२ | परभणी (४०,९३६), नांदेड (२८,५५५) यवतमाळ (५६७१) |
| २. | भिल्ल | ६,७८,७५० | धुळे (३५८०८८), नासिक (१३५७३६) जळगांव (८७,०१५), अहमदनगर (५७४१६) औरंगाबाद (२०,८०१) |
| ३. | धानका | ५२,६४९ | धुळे (३५५१९), जळगांव (१७,९६९) |
| ४. | घोडीया | ९,९२६ | ठाणे (६१२३), मुंबई (३४५८) |
| ५. | दुबळा | १२,४७४ | ठाणे (७९७५), मुंबई (३७९५) |
| ६. | गामीत | १,२८,८३१ | धुळे (१,१८,५८९) |
| ७. | गोंड | २,२१,७९८ | चांदा (२,०२,९०५), यवतमाळ (१०२४७२) नांदेड (१५७८६) |
| ८. | हलबा, हलबी | ७,२०५ | चंद्रपूर (५३२१), यवतमाळ (१७११) |
| ९. | काथोडी, कातकरी | १,४६,७९५ | कुलाबा (६७,५६३), ठाणे (५६,२२०) पुणे (७१०१), नासिक (२८०४), रत्नागिरी (९,४५३) |
| १०. | कवर | २,८७७ | चंद्रपूर (२,८७२) |
| ११. | खारोया | २,८२७ | यवतमाळ (२४१९) |
| १२. | कोकणा | २,६४,००९ | नासिक (१,६४,४६९), धुळे (६५,४७०), ठाणे (२२,००२) |
| १३. | कोलाम | ५६,०६१ | नांदेड (२६२६), चंद्रपूर (२५५६), यवतमाळ (४९,७७५) |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १४. | कोळी ढोर | ४२,५२८ | पुणे (२८८५), मुंबई (५५५२) ठाणे (५६९७), नासिक (५९९४), धुळे (७४८८), जळगांव (६२५४), अहमदनगर (५९००) |
| १५. | कोळी महादेव किंवा डोंगरकोळी | ३,३९,८५५ | नासिक (१,८१,०८३), पुणे (६३,९०९), अहमदनगर (५७,७७९), ठाणे (२९,६६०) कुलाबा (७,४२४) |
| १६. | कोळी मल्हार | ९९,६१३ | ठाणे (९९,६१३) |
| १७. | कोरकू | ६७,७४२ | अमरावती (६७,७१२) |
| १८. | निहाल | ३,६०४ | अमरावती (३,६०४)) |
| १९. | नायकडा | ९,३१५ | धुळे (५,४८७) |
| २०) | परधान | ५९,९१० | यवतमाळ (३९,३३८), चंद्रपूर (१४,५८१), नांदेड (२९३०) |
| २१. | पारधी | २४,९५६ | नासिक (१०९९), अहमदनगर (१७८०), सोलापूर (५६४३), धुळे (४१३४), जळगांव (७३३५), यवतमाळ (१८५७) |
| २२. | ठाकर (का ठाकर व मा ठाकर सहीत) | १,७८,८०५ | ठाणे (७५,५६३), कुलाबा (३०,०४४), पुणे (२३,७१७), नासिक (२८,२५५), अहमदनगर (२१,२२६) |
| २३. | वारली | २,९३,९३१ | ठाणे (२,६१,७५३), नासिक (२६,९६७), मुंबई (४८८७) |
| २४. | विटोलिया | १,०३१ | धुळे (९५१) |
| २५. | अनिर्धारित आदिवासी जमाती | ६८,६२० (१ हजार लोकसंख्येपेक्षा कमी संख्या असणाऱ्या २० जमातींची लोकसंख्या) | कुलाबा (८०७६), नासिक (१२४८८) धुळे (७८२१), जळगांव (५०७४), बृहन्मुंबई (९७३२). |

..६

## परिशिष्ट नं १.

## जिल्हावार आदिवासी लोकसंख्येचे ऐकूण आदिवासी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण.

( १९७१ च्या जनगणनेनुसार)

| राज्य-विभाग-जिल्हा | ऐकूण आदिवासी लोकसंख्या. | आदिवासी लोकसंख्येचे ऐकूण आदिवासी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण. | आदिवासी लोकसंख्येचे ऐकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| महाराष्ट्र : | २९,५४,२४९ | १००.०० | ५.८६ |
| १. मुंबई विभाग | २०,३५,१५१ | ६८.८९ | ११.५२ |
| मुंबई शहर | ३०,०१६ | १.०२ | ०.५० |
| ठाणे | ५,७९,८३८ | १९.६२ | २५.४० |
| कुलाबा | १,१३,५०२ | ३.८४ | ८.९९ |
| रत्नागिरी | १०,०६६ | ०.३४ | ०.५१ |
| नाशिक | ५,६१,२०२ | १९.०० | २३.६९ |
| धुळे | ६,१५,८०१ | २०.८४ | ३७.०५ |
| जळगांव | १,२५,०२६ | ४.२२ | ५.८९ |
| २. पुणे विभाग : | २,७२,६४० | ९.२२ | २.०९ |
| अहमदनगर | १,४५,७८३ | ४.९३ | ६.४२ |
| पुणे | १,०८,४०५ | ३.६७ | ३.४१ |
| सातारा | ३,६३० | ०.१२ | ०.२१ |
| सांगली | २,४३५ | ०.०८ | ०.१६ |
| सोलापूर | ८,६०८ | ०.२९ | ०.३८ |
| कोल्हापूर | ३,८०९ | ०.१३ | ०.१९ |
| ३. औरंगाबाद विभाग : | १,३७,७०८ | ४.६७ | १.७१ |
| औरंगाबाद | ३२,३०० | १.०९ | १.६४ |
| परभणी | ४२,१०१ | १.७३ | २.७९ |

..७

| १ | २ | ३ | ४ |
| --- | --- | --- | --- |
| ३. **औरंगाबाद विभाग :** | | | |
| पुढे चालू .. | | | |
| बीड | ४,३९४ | ०.१५ | ०.३४ |
| नांदेड | ५६,३०९ | १.९१ | ४.०३ |
| उस्मानाबाद | २,६०४ | ०.०९ | ०.१४ |
| ४. **नागपूर विभाग :** | ५,०८,७५० | १७.२२ | ४.३६ |
| ० बुलढाणा | -- | -- | -- |
| ० अकोला | -- | -- | -- |
| ० अमरावती | ७९,३७१ | २.६९ | ५.१५ |
| ० यवतमाळ | १,९७,९७७ | ६.७० | १३.९१ |
| ० वर्धा | -- | -- | -- |
| ० नागपूर | -- | -- | -- |
| ० भंडारा | -- | -- | -- |
| चंद्रपूर | २,३१,४०२ | ७.८३ | १४.११ |

० ह्या जिल्ह्यांच्या अनुसूचित क्षेत्राबाहेर सुमारे ८ लाख आदिवासी लोकसंख्या आहे. १९७१ च्या जनगणनेत त्यांची गणना झालेली नाही. क्षेत्रबंधन उठविल्यानंतर ह्या आदिवासींना सवलतीचा लाभ मिळू लागला आहे.

..८

## परिशिष्ट नं. ३

### ५ टक्क्याहून अधिक आदिवासी लोकसंख्या असलेले तालुके.

(१९७१ च्या जनगणनेनुसार)

| जिल्हा | तालुका | एकूण आदिवासी लोकसंख्या | एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे शें. प्रमाण. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| पुणे | आंबेगांव | २७,६२२ | १९.८३ |
| | जुन्नर | ३५,४५६ | १७.०१ |
| | खेड | २२,४६१ | ११.४० |
| | मावळ | ९,८७३ | ६.५२ |
| अहमदनगर | अकोला | ६६,१३२ | ४४.७७ |
| | संगमनेर | १७,१२७ | ७.८३ |
| | राहुरी | ११,९९० | ७.५२ |
| | कोपरगांव | १७,२४३ | ६.५६ |
| | श्रीरामपूर | १२,७३२ | ५.१४ |
| ठाणे | मोखाडा | ५०,४११ | ९२.६२ |
| | जव्हार | ८५,३२८ | ८८.९८ |
| | तलासरी | ४७,११२ | ८८.३१ |
| | डहाणू | १,२१,५२४ | ६४.९३ |
| | वाडा | ४०,९३५ | ४८.८५ |
| | पालघर | ७४,९५४ | ३५.१२ |
| | शहापूर | ४५,८७९ | ३२.०१ |
| | मुरबाड | २३,२०४ | २३.४० |
| | वसई | ३२,३०४ | १५.१६ |
| | भिवंडी | २[illegible],४१४ | ११.५५ |
| कुलाबा | कर्जत | २५,९८० | २३.५९ |
| | खालापूर | १५,१९८ | २१.०२ |
| | सुधागड | ९,११७ | २०.३० |

..९

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| कुलाबा पुढे चालू .. | | | |
| | पेन | १२,१५२ | १२.१३ |
| | रोहा | ८,६५२ | ९.५५ |
| | पनवेल | १३,६७८ | ९.२२ |
| | मानगांव | ८,२७० | ५.७४ |
| नासिक | सुरगाणा | ६६,७७१ | ९९.७७ |
| | पेठ | ७७,७८८ | ९४.४३ |
| | कळवण | ५९,६५८ | ४७.९८ |
| | दिंडोरी | ६५,३७९ | ४७.७६ |
| | इगतपूरी | ५१,६३० | ३७.६२ |
| | बागलाण | ५७,६७९ | २९.२६ |
| | चांदवड | १६,६८४ | १४.२२ |
| | निफाड | ३०,३४५ | १४.०० |
| | नासिक | ५७,३७९ | १३.५१ |
| | नांदगांव | १५,७५० | १०.७६ |
| | सिन्नर | १७,६२२ | १०.७८ |
| | मालेगांव | ३६,२७४ | ८.५१ |
| | येवला | ८,२४१ | ६.५० |
| धुळे | आकृणी (महाल) | ४३,०३४ | ९४.३३ |
| | नवापूर | १,१४,०८२ | ८६.८० |
| | अक्कलकुवा | ६६,५५० | ८४.५५ |
| | तळोदा | ४४,४३० | ६३.४८ |
| | साक्री | १,०२,१९९ | ४३.८० |
| | शहादा | ७९,७५८ | ४३.४८ |
| | शीरपूर | ३७,३२४ | २४.२६ |
| | सिंदखेडा | २४,५५८ | १२.१७ |
| | धुळे | ३६,७८१ | ९.६६ |

..१०

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| जळगांव | चोपडा | १४,६१३ | ९.४७ |
| | पारोळा | ८,२६५ | ८.२५ |
| | यावल | १३,२९४ | ८.०८ |
| | रावेर | १३,३७० | ७.५४ |
| | जळगांव | ६,९४९ | ७.२२ |
| | अमळनेर | १२,७२५ | ६.८१ |
| | एरंडोल | १२,२११ | ८.८० |
| | चाळीसगांव | १३,५९९ | ६.७६ |
| अमरावती | मेळघाट | ७९,३७१ | ७३.६६ |
| यवतमाळ | केळापूर | ८१,४१७ | ३२.१६ |
| | वणी | ५१,६१५ | २४.१७ |
| | यवतमाळ | ६४,१८५ | २२.८० |
| चंद्रपूर | सिरोंचा | ७४,३३१ | ५२.१० |
| | गडचिरोली | १,२२,२३४ | ३२.२८ |
| | राजुरा | ३२,८३७ | २६.८७ |
| नांदेड | हदगांव | १५,०५० | ८.८४ |
| परभणी | कळमनुरी | २०,४५० | १२.८५ |

## २. आदिवासींचे सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक जीवन.

गेल्या पंचवीस वर्षात आदिवासी जीवनासंबंधी बाह्य समाजाला पुष्कळ माहिती झालेली आहे. या कालावधीत महाराष्ट्रातील बिगर आदिवासी समाजाशी आदिवासींचा खूप संपर्क आलेला आहे. संस्कार, संस्कृती, आचार विचार यांची त्यांच्यात देवाण घेवाण वाढली आहे. पूर्व काळांत ज्या समाज सेवकांनी आदिवासींच्या उन्नतीच्या कार्याला वाहून घेतले होते, त्यांच्या सेवेला आता महत्व प्राप्त झालेले आहे आणि त्यांच्या कार्याचे मूल्यमापनही होवू लागले आहे. सेवाकार्यासाठी निर्माण झालेल्या संस्थांनी केलेली कामे व शासनाने दिलेला मदतीचा हात त्यामुळे आदिवासी समाज सुधारणेच्या कार्याला गति मिळत आहे.

### सांस्कृतिक जीवन :

महाराष्ट्रांत आदिवासींच्या ज्या अनेकविध जमाती आहेत त्या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालीरीती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा किंवा अेकविधता आढळत नाही. प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातीचा मानसिक पिंड व व्यापक अर्थाने सामाजिक जीवन यांच्या भोवतालचा भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत आलेल्या आणि रुढ झालेल्या जीवन दृष्टीने बनलेले आहे. तसे असले तरी सर्व सामान्य आदिवासींचे जीवन, त्यांची मूल्ये आणि वैशिष्ट्ये त्यांच्यात सारखेपणा आढळतो. सर्वसामान्य आदिवासी हा भोळा भाबडा, अबोल, त्र्यस्तां बरोबर शक्यतो बोलण्याचे टाळणारा, प्रामाणिक, पापभिरु, दैववादी, परंपरागत जीवन दृष्टिचा, निसर्गाच्या सानिध्यांत रमणारा, जिवनाचा स्वच्छंदतेने आनंद लुटणारा असतो. तो जंगल द-याखो-यात राहणारा असला तरी त्याची राहाणी त्याच्या निर्मळ अंत:करणाप्रमाणे साधी व स्वच्छ असते. त्यांच्यातील आत्मियता आणि सचोटी हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. त्यांची जीवनाकडे पहाण्याची स्वतंत्र आणि वेगळी दृष्टी आहे. त्यांच्या जीवनात पैशाला फार स्थान नाही. जमीन, गुरे, ढोरे, कोंबड्या, मासे, बकडे आणि यासाठी मजबूत हातपाय हीच त्यांची संपत्ती आहे. आपणांस हवे ते निसर्गातून व सभोवतालच्या साधनातून मिळविण्याची शक्यता असेल तर आदिवासी स्वत:ला अत्यंत सुखी समजतो. छोटेसे गांव हेच त्याचे जग. येथे पैशाला आणि बाहेरच्या वस्तुला फार कमी स्थान आहे. दळणवळणाच्या साधना अभावी दूरवरच्या बाजारांत चालत जावून आपल्या

वस्तु विकावयाच्या आणि त्यांच्या मोबदल्यांत आपल्याला हव्या त्या वस्तु घ्यावयाच्या ही त्याच्या जीवनाची आर्थिक घडी आहे. त्याच्या जीवन प्रवाहाचे वर्णन चार शब्दांत करता येईल. "अन्न, दारु, स्त्री आणि सावकार" ह्या चार बाबी सहज सुलभतेने मिळविण्याची त्याची धडपड असते. आदिवासींची गावे अेकाच जमातीची आणि गटागटाने वसलेली असतात त्यामुळे या भागांत कारागीर वर्ग सापडत नाही. स्थानिक साधनाव्दारे घरे निर्माण करावयाची व १०-१२ झोपड्यांच्या गटाने रहावयाचे, याला ते पाडा किंवा झाप म्हणतात. आदिवासींचे १०-१२ पाडे मिळून त्यांचे अेक गांव होते. पाड्याचे नांवे तेथे राहाणाऱ्या प्रमुख कुळाचे, भौगोलिक स्थळाचे, वनस्पतीचे, अगर प्राण्याचे असते. उदा. बोरवाडी, वाघ्याची वाडी, डोंगरपाडा. आदिवासींच्या झोपड्या लहान असतात. त्यांचे क्षेत्रफळ १०० ते २०० चौ.फूट असते. घरांना मातीच्या भिंती किंवा बांबूचे लाकडाचे कूड असतात. छप्पर गवताचे असते. जनावरे बांधण्याची सोय घरातच अेका बाजूला किंवा घराच्या शेजारी केलेली असते. आदिवासींच्या घरांत रोजच्या गरजेअितकी भांडी देखिल नसतात. घरांत अन्नधान्य साठविण्यासाठी मातीची साठवणी केलेली असतात. त्याला "कणगुली, कोथुली" म्हणतात. त्याचा पेहरावही अगदी साधाच असतो कमरेला लंगोटी किंवा गुडघ्यापर्यन्त लावलेला धोतराचा कचा, अंगात कोपरी किंवा पेहरन असते. आदिवासी वर्षातून अेकदाच कपडे घेतो. आर्थिक परिस्थितीमुळे वारंवार नवीन कपडे घेणे त्याला अशक्य असते. स्त्रीयांचा पेहराव प्रत्येक जमातीत वेगवेगळा आढळतो. कोकणा, महादेव कोळी, ठाकर जमातीच्या स्त्रिया डोक्यावरुन "फडकी" नावाचे वस्त्र घेतात. ते वस्त्र लाल रंगाचे असते. त्यावर डिझाअिन केलेली असते. भिल्ल समाजातील स्त्रिया ९ वारी लुगड्याचे दोन तुकडे करतात. अेक तुकडा नेसतात आणि दुसरा तुकडा डोक्यावरुन घेतात. ठाकूर, भिल्ल, कातकरी, जमातींच्या स्त्रियांची पेहराव पध्दती वेगवेगळी आढळून येते. स्त्रियांच्या दागदागिन्यातही प्रत्येक जमातीत वेगवेगळी वैशिष्टये आढळतात. आदिवासीपैकी महादेव कोळी, कोकणा, ठाकर आणि भिल्ल जमाती शेतीवर स्थिर झालेल्या आहेत. माडिया गोंड, कोलाम आणि कातकरी यांचे आर्थिक आणि सामाजिक जीवन अद्यापही अस्थीरच आहे. गांवात अशुभ घडले तर माडिया गोंड लोक गांव सोडून दुसऱ्या ठिकाणी वस्ती करुन रहातात. परंतु स्थलांतर करुन रहाणाऱ्या आदिवासींची संख्या दिवसेंदिवस कमी होऊ लागली आहे.

आदिवासींच्या धार्मिक रुढी, निसर्ग आणि प्राणी पूजेतून निर्माण झाले आहेत. निसर्गातील गूढ अनाकलनीय ते सर्व पूजनीय आहे असे ते मानतात.

आकाश, आकाशातील चमकणारी वीज, सूर्य, चंद्र, तारे, ढग, प्रचंड वृक्ष, वाघ, सिंह, साप, विंचू अशा निसर्गनिर्मित सजीव निर्जीव वस्तुंची आणि प्राण्यांची ते पूजा करतात. त्यांच्यात हिरवा, हिमाअी, वाघदेव, चित्ता, डोंगरदेव, वनदेव, गांवदेव, कणसरी आणि घरतारी वगैरे इत्यादी देवदेवते देखील आहेत. आदिवासी आपल्या पूर्वजांना व पितरांना देव मानतात. भूत पिशाच्च देखील त्यांना देवासारखीच वाटतात. ते वेडा, मुंजा, झुपली, वीर, हडळी, वैस इत्यादि नावांनी ओळखतात. दगडाचे किंवा लाकडाचे मुखवटे करून गांवाच्या वेशी बाहेर अुभी केलेली दैवते हे त्यांचे पूर्वज असतात. ब-याच आदिवासी जमातींनी हिंदु दैवतांचा स्विकार केला आहे. दत्तेश्वरी, मन्नादेवी, लक्ष्मी, चामुंडा, महादेव, नारणदेव, भैरोबा, खंडोबा, मारुती अित्यादी हिंदु दैवतांची ते पूजा करतात. कॉलरा, प्लेग या सारखी रोगराअी असल्यास भूत, पिशाच्चांच्या कोपामुळे ती होते अशी आदिवासीची श्रध्दा आहे. ही रोगराअी कशी अुद्भवली ? त्यावर अुपाय काय आहेत हे शोधून काढण्यासाठी प्रत्येक गांवात "भगत" असतो. भगताला दैवी शक्तीचा परिचय असतो. अनाकलनीय गोष्टी त्याला कळतात. भूत पिशाच्चाचे निर्मूलन किंवा बंधन करण्याचे तंत्र भगताला अवगत असते. यावर आदिवासींचा विश्वास आहे. त्याने सुचविलेले अुपाय अघोरी असतात. पण भोळे भाबडे आदिवासी श्रध्दाळूपणाने ते अुपाय करतात. आदिवासीमध्ये धार्मिक आणि सामाजिक विधीत मद्याला, दारुला विशेष स्थान असते. जन्म, मृत्यू, लग्न, पंचायत पाहुण्याचा आदर सत्कार, घेणे, देणे, कुठल्याही निमित्ताने अेकत्र येणे झाले की दारु घेण्याचा कार्यक्रम होतो. स्त्रिया मुले देखील दारु घेतात. जन्मापासूनची त्यांची ती सवय असते. मूल जन्मल्यानंतर मुलाचे तोंडात दारुचा थेंब टाकला नाही तर ते मूल नशिबवान निघणार नाही असा त्यांच्यात समज आहे. मृत्यू पावलेल्या माणसाच्या तोंडातही दारुचा थेंब घालावाच लागतो. मनुष्याला मृत्यू आला तर प्रेत जागविण्यासाठी लोकांना दारु देण्याची व प्रेत वाहून नेणा-यांनाही दारु देण्याची प्रथा काही आदिवासी जमातीत अद्यापही आढळते. महाराष्ट्रांत माडिया गोंड, आदिवासी जमात वगळल्यास ब-याच जमाती हिंदुंचे सण मोठ्या अुत्साहाने साजरे करतात. हिंदु सणांत आदिवासी संस्कृतीचे मीलन झाल्यामुळे अर्धे हिंदु अर्धे आदिवासी झाल्याचे दिसून येते. आदिवासी समाजात बाळंतपणासाठी जी स्त्री असते तिला कांही "सोयरीण" म्हणतात. ती मुल जन्मल्या जन्मल्याच त्याचे नाळ कापण्याचे काम करते. तो मान तिचाच असतो. सटवाअीची पूजा काही आदिवासी जमातीत प्रचलित आहे. गर्भवती स्त्री मरण पावल्यास ती "हडळ" होते असाही लोकांचा समज आहे. त्यामुळे

अशा स्त्रिचे प्रेत पुरण्याऐवजी जाळण्याकडे लोकांचा कल असतो. माडिया गोंड आदिवासींत "गोटुल"ची प्रथा आहे. गोटुल म्हणजे गावातील अविवाहित तरुण तरुणींचे निवासस्थान. गांवातील सर्व तरुण तरुणी तेथे रात्री एकत्र येतात. त्यातून त्यांचा परिचय वाढतो. परिचयाचे रुपांतर पुढे लग्नातही होते. रात्रीची जेवणे झाल्यावर तरुण तरुणी गोटुलात असतात. गाणी, नाच, नृत्ये याचे प्राथमिक धडे त्यांना तेथेच मिळतात. नाच गाणी आणि नृत्ये हे आदिवासींचे वैशिष्ट्य. त्यांत त्यांच्या धार्मिक भावनाही असतात. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी नृत्ये केली जातात. पावसाळा संपून सुगीचा हंगाम आल्यावर आदिवासींच्या नृत्यांना सुरुवात होते. दिवाळीपासून पुढे महिनाभर काही जमातीत नृत्ये चालतात. "तारपा, कामठी, घोर, ढोल, भवाडा, शिमगा, दुडक्या" या सारखे अनेक कितीतरी प्रकारचे नाच करण्यांत आदिवासी रमलेले असतात. आदिवासी जमातीमध्ये मुलामुलींची लग्ने वयात आल्यावर होतात. बालविवाह सहसा होत नाहीत. ज्या आदिवासी जमाती हिंदू समाजाच्या अगदी निकट आल्या आहेत त्यांच्यात बाल विवाह होऊ लागले आहेत. आदिवासी जमातीमध्ये बहुपत्नित्वाची चाल रुढ आहे. घटस्फोटाची प्रथाही सर्वच जमातीत रुढ आहे. त्याप्रमाणे स्त्री पुरुषाला पुर्नविवाहाला देखील या समाजात पूर्ण वाव आहे.

आ रो ग्य :

आदिवासींच्या जीवनात आरोग्य आणि औषधोपचार ही महत्वाची बाब आहे. त्यांच्या विकासातील ही घोंड दूर करण्याची गरज आहे. आदिवासीला वर्षातून फक्त ३-४ महिने पोटभर जेवण मिळते आणि तेही सुगीच्या दिवसांत. उरलेल्या दिवसांत कधी उपाशी तर अर्धपोटी कधी कंदमुळावर गुजराण करतो. धान्य अगर पैसा जतन करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात क्वचित आढळते. वर्षातून कित्येक दिवस शुध्द, स्वच्छ आणि भरपूर पाणी मिळत नाही. अपूरा व निकृष्ट आहार, अस्वच्छ पाणी त्यामुळे मलेरिया, हगवण, क्षय, ताप, पोटाचे विकार, कातडीचे रोग यांच्याशी त्यांना सामना द्यावा लागतो. रोगराळी संबंधीच्या त्यांच्या कल्पना परंपरागत आणि भ्रामक आहेत. डॉक्टरांच्या औषधापेक्षा भगताच्या अंगारा, धुपाऱ्यावर त्यांचा अधिक विश्वास आहे. त्यांची अघोरी धार्मिकता व पिशाच्यपूजा यामुळे रोगाच्या साथीत आदिवासी लोकांची मोठी हानी होते. कॉलरासारखा रोग गांवात आल्यावर कांही जमातीत गांवबंदी होते. सरकारी डॉक्टरला देखील गांवात येण्यास बंदी

करण्यांत येते. लोकही गांव सोडून बाहेर जात नाहीत. अशावेळी अनेकांचे मरण अपरिहार्य असते.

साक्षरता आणि शिक्षण :

साक्षरता हे खऱ्या शिक्षकाचे मोजमाप होऊ शकणार नाही तरी देखील एखाद्या समाजात साक्षरतेचे प्रमाण किती आहे या वरुन त्यात्या समाजाची शैक्षणिक प्रगती व सामान्यज्ञान कोणत्या पातळीवर आहे याची थोडीफार कल्पना येते. गेल्या पंचवीस वर्षांत अनेक आदिवासी विभागांत शैक्षणिक दृष्ट्या अनेक सामाजिक संस्था कार्यकरित आहेत. शासन देखील आदिवासींच्या शिक्षणासाठी प्रयत्नशील आहे. इतके असून देखील आदिवासी विभागातील शिक्षणाची प्रगती समाधानकारक नाही त्याला मुख्यत: पालकांची उदासिनता आहे. लोकांचेअज्ञान व गरीबी ही कारणे आहेत. आदिवासी मुलांचे शिक्षण या दुष्ट चक्रातून बाहेर येत नाही कांही जमातीत शैक्षणिक जागृती वाढत आहे. उदा. महादेव कोळी, कोकणा, या जमातीत १९६१ च्या खानेसुमारीनुसार साक्षरतेचे प्रमाण १० ते १३ टक्के एवढे होते. आता १९७१ ला ते याहून अधिक वाढले आहे. आदिवासी विभागात क्षेत्र विकास योजने अंतर्गत "आश्रम स्कूल", "समूहकेंद्र" "मध्यवर्ती निवासी केन्द्र शाळा" आदिवासी उप योजनेचे विविध "आदिवासी सहकारी विकास महामंडळाची एकाधिकार धान्य खरेदी" खावटी कर्ज योजना, इत्यादी योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केल्या आहेत, त्या व्दारे आदिवासी विभागाचा विकास होत आहे. शिक्षणा-सारख्या महत्वाच्या कार्याला त्यामुळे गती प्राप्त झालेली आहे.

भाषा :

आदिवासी बोली भाषांचा प्रश्न शिक्षणाच्या दृष्टिने महत्वाचा आहे. महाराष्ट्रातील ४० आदिवासी जमाती ७४ बोलीभाषा बोलतात. त्यांत कांही मराठी बोलीभाषा आहेत तर कांही स्वतंत्र बोलीभाषा आहेत. १९७१ च्या जनगणनेनुसार केवळ १५ टक्के आदिवासी लोक चांगल्याप्रकारे मराठी बोलणारे व समजणारे आहेत अशी नोंद झाली आहे. दुर्गम जागी राहणाऱ्या गोंड-माडिया, गोंड, कोरकू, कोलम, भिल्ल जमातींच्या लोकांना मराठी भाषा समजण्याची अडचण जाणवते. त्यांच्या विकासात भाषेची ( Communication ) अडचण महत्वाची आहे. मुले शाळेत जावू लागली की ही अडचण त्यांनाही शाळेतील शिक्षण समजण्याच्या दृष्टिने जाणवते. त्यामुळे त्यांच्या प्रगतीला कांहीअंशी अडथळा निर्माण होतो.

..१६

आर्थिक प्रश्न, कर्जबाजार व शोषण :

आदिवासींचा प्रश्न हा खरा आर्थिक प्रश्न आहे. महाराष्ट्रभर आदिवासींची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. त्यांचे उपजिवीकेचे साधन शेती आणि जंगल. शेती व्यवसाय करणारांत स्वत:चे शेती असणारे, कुळ म्हणून शेती करणारे आणि शेतमजूर असे प्रकार दिसून येतात. कूळ कायद्यापूर्वी अनेक लोक शेतमजूर होते. कूळ कायद्याच्या आधारामुळे ते आता शेत मालक झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाने कायदेशीर व बेकायदेशीर जमीन हस्तांतराचा कायदा केल्यामुळे जे आदिवासी लोक जमिनीला मुकले होते त्यांना जमिनी मिळून ते पुन: जमिन मालक होऊ लागले आहेत. आदिवासी समाजांत शेतमजूरांची संख्या सुमारे ४०-४५ टक्के आहे. ज्या शेतकऱ्याकडे स्वत:ची जमीन आहे ते परंपरागत पध्दतीनेच शेती करतात. त्यामुळे शेतीतून उत्पन्न बेताचेच निघते. शेती शिवाय दुसरा धंदा म्हणजे जंगलतोड, मजुरी, कोळसा करणे, लाकूड वाहतूक, जंगलांतील वस्तु गोळा करणे, उदाहरणार्थ मध, डिंक, तेन्डूची पाने, मोहाची फुले, कढीपत्ता, शिकेकाई, हिरडा, बेहडा, कोकम, जंगली फळे या व्यतिरिक्त मजुरी आणि काम मिळवून देणारा दुसरा जोड धंदा आदिवासींना मिळत नाही. ठाणे जिल्हयातील कांही भागांत गवत कापणीचा व्यवसाय मिळतो. पण तो फक्त दिवाळी नंतरच्या हंगामातच. शेतीच्या व्यवसायात गुंतलेल्या आदिवासींची संख्या मोठी आहे. बहुसंख्य लोकांना जमिनी अपुऱ्या आहेत. अपुऱ्या जमिनीतून उत्पन्नही अपुरेच मिळते. त्याचा परिणाम म्हणून उदरनिर्वाहासाठी आदिवासींना कर्ज घ्यावे लागते. मूलत: उत्पादन कमी, अपुरा रोजगार, बाजार भावासंबंधीचे अज्ञान त्या शिवाय सण समारंभाचे आणि लग्न विधीचे खर्च यामुळे कर्जावाचून त्याला दुसरा पर्यायच नसतो. अशा प्रकारच्या कर्जावर सावकार, धनिक, जमीन मालक भरमसाठ व्याज आकारतो. पीक आल्यावर कमी भावाने सावकार त्याचे धान्य खरेदी करतो. व्याजाची रक्कम प्रथम वसूल करतो. मुद्दल तसेच राहते. पुढच्या वर्षी पुन्हा तेच चक्र फिरते. असे चक्र अव्याहत चालू असते. त्यातून आदिवासींना बाहेर पडता येत नाही. कर्ज घेणे व ते फेडणे हा त्याच्या जीवनाचा स्थायीभाव बनला आहे. कर्जाच्या तारणासाठी मुलगा किंवा मुलगी तारण ठेवण्याचे प्रकारही पूर्वी घडत होते. हल्ली ही प्रथा उघड स्वरुपात कुठे आढळून येत नाही. कधी कधी आदिवासी विवाहासाठी कर्ज काढतो. पण कर्ज फेडण्यासाठी नवऱ्या मुलाला सावकाराच्या व जमीनदाराच्या घरी "घरगडी" म्हणून राहून त्याची कामे करावी लागतात. लग्न झाल्यावर नवरा मुलगा.

पैसे फिटेपर्यन्त सावकाराच्या घरी काम करतो. त्याला लग्नगडी म्हणतात. येवढ्या अवधित ४-५ वर्षे निघून जातात. कर्ज फेडून नवरा मुलगा घरी जाईपर्यंन्त त्याची नववधू लग्नाची गांठ सोडून दुसऱ्याचा हात धरुन गेलेली असते. हे आदिवासींच्या जीवनाचे विदारक चित्र आहे. सावकाराचे कर्ज घेणे व ते फेडत राहणे हे पवित्र आणि प्रामाणिक काम आहे अशी त्याची मनोभूमीका आहे. सावकाराच्या दामतीवर त्याचा विश्वास आहे. सावकारांनाही आदिवासींची मनोभूमिका चांगली माहिती आहे. प्रसंगी कोणतेही तारण न घेता तो आदिवासीला कर्ज देतो. सरकारी कर्ज फक्त उत्पादना-साठीच मिळते, सावकार मात्र लग्न, समारंभ, सण, विधी, कपडालत्ता, इ. कोणत्याही कारणासाठी मागेल त्यावेळी कर्ज देतो आणि त्यामुळे सावकारावर त्याची नितांत श्रध्दा आहे. सावकारही आदिवासी देईल त्या स्वरुपात कर्ज स्विकारतो. तो त्याचे धान्य, मेहनत, जनावरे, वैरण, सरपणही घेऊ शकतो. त्यामुळे सावकाराचा आदिवासींवर जबरदस्त पगडा असतो. सरकारी पध्दतीने कर्ज मिळण्याची साधने अलिकडे आदिवासी विभागात निर्माण झाली आहेत. शेती सहकारी क्रेडीट सोसायट्या, विविध कार्यकारी सोसायट्या, खावटी योजना, पालेमोड योजना, आदिवासी विकास महामंडळाची एकाधिकार धान्य खरेदी, खावटी कर्ज योजना या द्वारा आदिवासींच्या सोयी होऊ लागल्या आहेत. तरीपण कर्जबाजारीपणाचा मुलभूत प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. महाराष्ट्र शासनाने दुर्बल घटकांच्या कर्ज मुक्तीचा कायदा करुन सावकार व जमिनदारांच्या कर्जातून मुक्त होण्याची आदिवासींना मोठी संधी प्राप्त करुन देण्यात आली आहे. अनेक आदिवासींनी या कर्ज मुक्तीचा फायदा घेतला आहे. कायम स्वरुपाचा बंदोबस्त होण्यासाठी आदिवासी उप-योजनेत आदिवासी सहकारी सोसायट्यांमार्फत आदिवासींना शेती विकासासाठी घरखर्च आणि खावटी-साठीही कर्ज देण्याची योजना उभी करण्यात आली आहे. आदिवासींचा शेती माल खरेदी करण्याचीही आदिवासी सहकारी सोसायट्यांची यंत्रणा उभी केली आहे. सावकार आदिवासींच्या ज्या गरजा भागवितो त्या यापुढे आदिवासी सहकारी सोसायट्यांनी भागवाव्यात व कर्जबाजार निर्मूलनाला मदत करावी अशी त्यात कल्पना आहे. आदिवासींचा शेतीमाल खरेदी करावा व त्यांना योग्य भाव मिळवून द्यावा हा ही, त्यामागील हेतू आहे. अशा २५० सोसायट्या उपयोजनेत स्थापन होऊन २० लाख आदिवासींना त्याचा फायदा मिळत आहे. आदिवासी सहकारी विकास महामंडळाच्या नियोजनाखाली हे कार्य चालू आहे. आदिवासींचे शोषण त्यामुळे थांबविण्यास व त्यांचा मालाला योग्य किंमत देण्यास महामंडळ यशस्वी होत आहे.

सामाजिक बदल :-

आदिवासींच्या सामाजिक प्रश्नाबाबत म्हणावयाचे तर त्यांचे एकंदर राहाणीमानात अलीकडे फरक पडू लागला आहे. बाहेरच्या जगाशी त्यांचा

संबंध वाढू लागला आहे. त्याचा परिणाम अेकंदर त्यांच्या राहणीमानावर होअू लागला आहे. कोकणा, महादेवकोळी, ठाकर ह्या जमातींनी हिंदु समाजाच्या चालीरिती अुचलल्या आहेत. अितकेच नव्हे तर त्यांनी आपला जुना धर्म सोडून हिंदु आचार विचार पध्दति स्विकारली आहे. इतरही जमाती या बदलांत सामील होत आहेत.

काही आदिवासी जमातीत सर्वात म्हाताऱ्या स्त्रीला "धवलेरी" म्हणतात. ती पूर्वी गाणी म्हणून लग्न लावीत असे. ही प्रथा हल्ली बंद पडत चालली आहे. काही जमाती अलीकडे भटजी किंवा अुपाध्याय कडून मुहूर्त काढून लग्ने लावू लागली आहेत. मरणानंतरचे संस्कारही काही जमातीत हिंदू प्रमाणे होअू लागले आहेत. त्यांच्यात पिंडदानही होते. आजारपणांत देखील लोक भगताकडे जाण्याअैवजी डॉक्टरकडे जाअू लागले आहेत. थोड्याफार प्रमाणात स्त्रियाही बाळंतपणासाठी सरकारी दवाखान्यांत दाखल होवू लागल्या आहेत. सुशिक्षित आदिवासींना नाच गाण्याची लाज वाटू लागली आहे. पूर्वीचे जंगले तोडून शेती करण्याची पध्दती म्हणजे "स्थलांतरीत शेतीची पध्दत" बंद होअून स्थिर आणि कायम स्वरुपाची शेती करण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. नवीन सुधारलेले बी-बीयाणें, खते, अवजारे, यांची आवडही आदिवासींत वाढू लागली आहे. आदिवासी आता आधुनिकतेच्या जवळ येत चालला आहे. तारपा वाद्याच्या तालावर म्हटली जाणारी वारल्यांची गाणी आधुनिक पध्दतीची वाटतात. जुनी गाणी लोपली आहेत. काही ठिकाणी शिक्षणाची अुत्तम सोय होवू लागली आहे. आदिवासींची मुले आश्रम शाळेत जावू लागली आहेत. धीट होअू लागली आहेत, स्वच्छ कपडे घालु लागली आहेत. नाचगाण्या अितकाच शिक्षणातही रस घेवू लागली आहेत. आता जंगलांना जाग येवू लागली आहे. आदिवासींच्या नृत्यांनी जेवढा आनंद होअील त्याहून कितीतरी जास्त आनंद आश्रम शाळेतील ताठरीत मुलांच्या दर्शनाने होअील अशी स्थिती येवू लागली आहे. आदिवासींच्या जीवनाची ही पहाट जास्त विलोभनीय आहे. आदिवासींच्या स्त्री पुरुषांच्या चेहऱ्यावर अेक प्रकारचा भेडभाग असतो तो हळूहळू कमी होअू लागला आहे. अेकूण आदिवासी जागा होण्याची पहाट महाराष्ट्रात होत आहे.

नवा माणूस दिसला की आदिवासी घाबरतो, बुजतो, चाचरतो, शक्यतो बोलण्याचे टाळतो पण आश्रमशाळा मधील मुले हा भेकडपणा टाकून पुढे गेली आहेत. आदिवासीमध्ये असलेल्या चांगल्या गोष्टींची अुपासना करुन

..१९

त्यांना नागरी संस्कृतीची भिती वाटणार नाही. अितपत धीट करण्याचे कार्य आश्रम शाळा करीत आहेत. महाराष्ट्र राज्यात शासकीय आणि खाजगी संस्थांच्या मार्फत चालविल्या जाणाऱ्या अशा अेकूण आश्रमशाळा आहेत. अशा शाळामधून आज सुमारे मुले व मुली इयत्ता १ ते ७ पर्यन्त शिक्षण घेत आहेत. माध्यमिक आश्रमशाळा ही सुरु करण्यात आलेल्या आहेत. आश्रमशाळांमधून शिकणारी आदिवासींची ही मुले, त्यांच्यातूनच नवा समाज, नवा मानव, ताठ मानेने जगणारा उद्याचा नागरिक निर्माण होत आहे. आदिवासीचे सारे जीवन आता बदलू पाहात आहे. हळू हळू त्यांच्या त देखील नवनिर्मितीची प्रक्रिया वाढत आहे. ठक्कर बापासारखी माणसे आता मिळणार नाहीत, पण माणुसकी असलेली, त्यांना जाणून घेणारी, त्यांच्या सुखदु:खांशी समरस होणारी माणसे त्यांना हवी आहेत. नव्या जाणिवा व चेतना देणाऱ्या नेतृत्वाची आदिवासींना आज गरज आहे.

## विभाग दुसरा

### ३. आदिवासींच्या विकासाचा कार्यक्रम.

(१) समाजकल्याण विभाग विकास योजना :

आदिवासींची आर्थिक, सामाजिक वैं शैक्षणिक परिस्थिती लक्षांत घेऊन गेल्या ४-५ पंचवार्षिक योजनांत अनेक प्रयत्न करण्यांत आले. अगदी प्रथम सर्वोदय केन्द्रामार्फत आदिवासींचा विकास घडवून आणण्याची कल्पना होती. त्यानंतर आदिवासी विकास गटाची स्थापना करुन आदिवासी भागाचा व तेथे राहाणाऱ्या लोकांचा विकास घडविण्याचे कार्य करण्यांत आले. परंतु पाहिजे तसा आर्थिक, सामाजिक विकास यांतून झाला नाही. त्यानंतर १९७४-७५ मध्ये आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी आदिवासी अुपाययोजना तयार करण्यांत आली, व त्या व्दारा आदिवासी विकासाचा कार्यक्रम घेण्यांत येत आहे.

सर्वसामान्य व अुपयोजनेच्या विशेष आर्थिक तरतुदीतून आदिवासी विकासाचे जे कार्यक्रम घेतले जातात ते स्थूलमानाने चार प्रकारात मोडतात :

(१) शैक्षणिक सवलती.

(२) आदिवासींची आर्थिक अुन्नती.

(३) आरोग्य, गृहनिर्माण व इतर योजना.

(४) आदिवासी अुपयोजनेंतर्गत क्षेत्र विकासाचे कार्यक्रम.

### (१) शैक्षणिक सवलती.

शिक्षण क्षेत्रांत आदिवासींसाठी देण्यांत आलेल्या सहाय्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे :-

(अ) शिक्षण फी व परीक्षा फी देण्यापासून सूट देणे व शिष्यवृत्त्या देणे.

(ब) मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे अुघडणे.

(क) आदिवासींसाठी वसतिगृहे चालविण्याकरिता स्वयंस्फूर्त संस्थांना सहाय्यक अनुदान देणे.

(ड) आदिवासींसाठी शैक्षणिक संस्थांत ७ टक्के जागा राखीव ठेवणे.

आदिवासी जमातींच्या विद्यार्थ्यांना वय व अुत्पन्न या गोष्टी लक्षांत न घेता सर्व मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांमधील त्यांच्या शिक्षणाच्या सर्व पातळीवर शिक्षण फी, परीक्षा फी व इतर सवलतीची देय फी देण्यापासून सूट देण्यात येते. मात्र अल्प मुदतीचे पाठ्यक्रम व अंशकालिक पाठ्यक्रम यातून वगळण्यांत

आले आहेत. शालान्त परीक्षापूर्व इयत्तांसाठी आदिवासी जमातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. शालान्त परीक्षोत्तर शिक्षणासाठी भारत सरकारने पुरस्कृत केलेली अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या देणे या नांवाची अेक विशेष योजना आहे. या शिष्यवृत्तींमध्ये विहित दराने द्यावयाचा निर्वाह खर्च आणि संबंधीत शैक्षणिक संस्थेत विद्यार्थ्यांनी भरावयाच्या सक्तीच्या सर्व फी चा समावेश आहे. वसतिगृहात राहाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा निवास व भोजन विषयक सर्व भागविण्यासाठी जास्त दराने निर्वाह खर्च विहित करण्यांत आला आहे. आदिवासी जमातीच्या व अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना बहुतेक सर्व खर्च देण्याचा ह्या योजनेचा अुद्देश आहे. तसेच (१) सैनिकी शाळा, सातारा, (२) श्री.शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल,पुणे व (३) भोसला मिलिटरी स्कूल,नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना त्याच्या आई-वडिलांचे मासीक अुत्पन्न ७५० रु. पेक्षा कमी असल्यास शिक्षणावरील संपूर्ण खर्च समाजकल्याण विभागाकडून संबंधित संस्थेस थेट देण्यांत येतो.

वसतिगृह सुविधा :

आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण विषयक सवलतींचा फायदा घेणे शक्य व्हावे म्हणून शासनाने वसतिगृह सुविधांची तरतूद केली आहे. ह्या वसतिगृहामध्ये विनामूल्य, भोजन व निवास, पाठ्य पुस्तकें, लेखन सामुग्री, गणवेश, बिस्तारा, विनामूल्य वैद्यकिय मदत, वाहन व खास शिक्षण विषयक इत्यादिंसह सर्व सुविधांची तरतूद केलेली आहे. सध्या अशी अेकूण ६९ शासकीय वसतिगृहें महाराष्ट्र शासनामार्फत चालविण्यांत येतात.

स्वयंस्फूर्त संस्थांना अनुदान :

शासनामार्फत चालविण्यांत येणाऱ्या वसतिगृहाव्यतिरिक्त स्वयंस्फूर्त संस्थांना शासनातर्फे नियमानुसार प्रतिव्यक्ती अनुदान म्हणून दहा महिन्याकरितां दरमहा रु. ६० व मुलींसाठी दरमहा रुपये ६५ या दराने सहाय्यक अनुदान देण्यांत येते. ज्या वसतिगृहांना जागतिक अन्न कार्यक्रमाखाली सहाय्य देण्यांत येते, त्या वसतिगृहांना मुलांसाठी व मुलींसाठी अनुक्रमे दहा महिन्याकरितां दरमहा रु.५० व दरमहा रु. ५५ या दराने प्रतिव्यक्ती अनुदान देण्यांत येते. त्यांना पूर्ण कालीक प्रशिक्षित अधिक्षकांची वेतने व इमारतीचे भाडे यासाठी देखील सहाय्य देण्यांत येते. स्वेच्छा संस्थांमार्फत महाराष्ट्रात अेकूण १२२७ सहाय्यक मागासवर्गीय वसतिगृहें चालविली जातात व त्या संस्थांमधून अेकूण ५५,२२३ मुले शिक्षण घेतात. त्यापैकी ११,२१२ मुले आदिवासी जमातीपैकी आहेत.

..२२

बालवाड्या :

स्वच्छतेने शिक्षण देण्यासाठी व शिक्षणाकडे कल वाढीस लावण्यासाठी ही योजना सुरु करण्यांत आली आहे. कोवळ्या वयाची २० ते ४० मुले प्रत्येक बालवाडीत दाखल करुन घेतली जातात. यापैकी १० टक्के मुले सवर्ण हिंदु मुले असतात. अधिपरिचारिका व दाई यांचे वेतन, दूध व फराळाचे जिन्नस, दरमहा रुपये ५० व घरभाडे दरमहा रुपये २५ यासारख्या खर्चाच्या मान्य बाबींवर अनुज्ञेय खर्चाच्या ९० टक्के मर्यादेपर्यन्त सहाय्यक अनुदान देण्यांत येते.

ह्या व्यतिरिक्त स्वच्छता, शिक्षण विषायक गोडी, चांगल्या सवयी मुलांच्या अंगी बाणण्यासाठी बालवाडीचा कार्यक्रम देखील हाती घेण्यांत आला आहे.

स्वयंस्फूर्त संस्थांनी चालविलेल्या आश्रमशाळा :

अनुसुचित क्षेत्रात राहणाऱ्या अनुसुचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष उपाय म्हणून शासनाने आश्रमशाळा आणि जनजातींच्या मुलांच्या निवासाची सोय असलेल्या संस्था स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. या प्राथमिक शाळा आहेत. आश्रमशाळा ही निवासशाळा असल्यामुळे तिला जोडूनच एका वसतिगृहाची व्यवस्था करण्यांत आली आहे व या वसतिगृहात ज्यांच्याकरिता ही शाळा उघडण्यांत आली आहे, अशा जमातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येतो. घरसफाईकाम, कताई व विणाई, कुक्कुटपालन, इत्यादी सारख्या सोप्या व्यवसायाचे शिक्षण देण्याची तरतूद सुरुवातीच्या टप्प्यावरच करण्यांत आली आहे. अशा शाळांमध्ये शिकविण्याचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. आश्रमशाळा उघडण्याची परवानगी अनुसूचित जमाती - विमुक्त जाती - भटक्या जमाती इत्यादिंकरिता शाळा चालविण्यांत ज्या स्वेच्छा संस्थांना रस असेल व ज्यांची शासनाने घालून दिलेल्या शर्ती व अटींनुसार शाळा चालविण्याची तयारी असेल अशा स्वेच्छा संस्थांना देण्यात येते. मान्यता प्राप्त आश्रमशाळा ह्या पुढील अनुदाने मिळविण्यास पात्र असतात.

(१) परिरक्षण अनुदान,

(२) साधनसामुग्री अनुदान,

(३) इमारत अनुदान आणि

(४) शासन मंजूर करील, अशी इतर अनुदाने.

ह्या अनुदानात शिक्षक व इतर कर्मचारीवर्ग यांचे वेतन व भत्ते, आकस्मिक खर्च इमारतीचे भाडे, स्वयंपाक्यांचे वेतन, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची

जिधा वेतने, भांडी खरेदी करणे, पोषाख, बिछाने इत्यादि वरील खर्चाचा समावेश आहे. राज्यातील आदिवासीसाठी चालविलेल्या आश्रमशाळांची अैकूण संख्या ३२० आहे. त्यापैकी ४ ह्या माध्यमिक आश्रमशाळा आहेत.

## ३. आर्थिक अुन्नतीचे व गृहनिर्माण कार्यक्रम.

मागासवर्गीयांच्या व आदिवासीच्या आर्थीक अुन्नतिसाठीं शेतकरी, कुटीर अुद्योग करणाऱ्या व्यक्ति यांच्या कल्याणाकरीतां योजना आखलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणें आहेत.:-

(१) कुटीर अुद्योग व व्यवसायाकरितां कर्ज नि सहाय्य देण्याची योजना.

(२) शेतीची सुधारित अवजारे बनविण्यासाठी कर्ज नि सहाय्य देणे.

(३) सिंचत विहिरीकरितां व शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनींचा विकास करण्याकरिता कर्ज नि सहाय्य.

(४) औद्योगिक संस्थांना वित्त सहाय्य.

(५) पंप संच बसविणे इत्यादि.

याशिवाय राज्य परिवहन प्राधिकाऱ्यांच्या सहाय्याने मोटार चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना आखली आहे. प्रतिवर्षी १०० लोकांना असे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. आदिवासी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना व लघुअुद्योग करणाऱ्यांना वित्त सहाय्य देण्याच्या योजना जिल्हा परिषदेव्दारे राबविण्यांत येतात.

शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व निमभटक्या जमाती व विमुक्त जातीच्या व्यक्तींना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत प्रत्येक सत्रात ७५ शिकाअू अुमेदवार याप्रमाणे वर्षातून तीन सत्रामध्ये मोटार चालविण्याचे प्रशिक्षण देण्याच्या योजनेला मंजूरी दिली आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक प्रशिक्षार्थीमागे ५०० रु. इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला देण्यांत येते.

(अ) जमिनीचा विकास :

मागास वर्गाच्या शेतकऱ्यांना जमिनीचा विकास, बांधबंदिस्तीसाठी समतलन इत्यादींसाठी अेकरी रु. ५०० या मर्यादेपर्यन्त ७५ टक्के बिनव्याजी कर्ज व २५ टक्के अर्थ सहाय्य या स्वरुपात आर्थिक सहाय्य देण्यांत येते.

..२४

(ब) जलसिंचनासाठी नवीन विहिरी बांधणे व जुन्या विहिरी दुरुस्त करणे :

जल सिंचनासाठी विहिरी बांधण्याकरिता रु. २,००० पर्यन्त बिनव्याजी कर्ज अनुज्ञेय आहे. विशेष प्रकरणी ही मर्यादा रु. ४,००० पर्यन्त वाढविता येते. ऐकूण खर्चाच्या २० टक्के किंवा रु. ६०० यापैकी कमी असेल त्या रकमेपर्यन्त अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी रु. १,००० पर्यन्त बिनव्याजी कर्ज अनुज्ञेय आहे. विशेष प्रकरणी ही मर्यादा रु. २,००० पर्यन्त वाढविता येते.

(क) शेतीच्या अवजारांची खरेदी :

खाली दर्शविल्याप्रमाणे लोखंडी नांगर व कोरडवाहू शेतीची अवजारे खरेदी करण्याकरिता मागास वर्गाच्या शेतकऱ्यांना रु. १०० पर्यन्त अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते.

| अवजारे | अर्थसहाय्य टक्के. | कर्ज टक्के. | वैयक्तिक अंशदान टक्के. |
|---|---|---|---|
| लोखंडी नांगर | २५ | ५० | २५ |
| कोरडवाहू शेतीची अवजारे | ३७ | ५० | १३ |

(ड) अविकसित ग्रामीण क्षेत्रात तेल इंजिनांचा पुरवठा करणे :

अविकसित ग्रामीण क्षेत्रातील व विशेषकरुन मागास वर्गाच्या ३ ते १६ ऐकर जमीन धारण करणाऱ्या व रु. १,८०० पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लहान शेतकऱ्यांना व जास्तीत जास्त रु. २,००० किंवा खर्चाच्या ६० टक्के यापैकी कमी असेल त्या रकमेने अर्थसहाय्य देण्यात येते. विजेच्या मोटारींच्या बाबतीत रु. १,००० पर्यन्त अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदांमार्फत केली जाते. या योजनांखालील आर्थिक सहाय्य अपुरे असल्यास जिल्हा परिषदा आपल्या उपकार निधितून १५ टक्के अर्थसहाय्य देतात.

मागास वर्गांना व्यवसाय यासाठी कर्ज नि अर्थसहाय्य :

सेवायोजन प्रचालन कार्यक्रमाखाली उद्योग विभागाद्वारे, सुशिक्षित बेकारांसाठी अंमलात आणल्या जाणाऱ्या "मागास वर्गाच्या उद्योजकांना लहान धंदे व लघुउद्योग यांसाठी आर्थिक सहाय्य" या योजनेशी निगडीत करुन ही योजना १९७६-७७ पासून ऐक अर्थसहाय्यित योजना म्हणून अंमलात आणली जात आहे.

प्रकल्पाच्या रु. १०,००० पर्यन्तच्या एकूण खर्चासाठी पुढीलप्रमाणे वित्तव्यवस्था करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| (अ) राष्ट्रीय बँकांकडून कर्ज | - | ७५ टक्के. |
| (ब) प्रादेशिक विकास महामंडळाकडून कर्ज | - | १५ टक्के. |
| (क) योजनेखालील अर्थसहाय्य | - | ५ टक्के. |
| (ड) मागास वर्गाच्या उद्योजकाचे वैयक्तिक अंशदान. | - | ५ टक्के. |

(४) व्यक्तींच्या गटासाठी योजना.

(१) मागास वर्गाच्या औद्योगिक सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य.

(२) संमिश्र सहकारी संस्थांचे शेअर खरेदी करण्यासाठी मागास वर्गातील व्यक्तींना कर्ज. या योजनांची अंमलबजावणी सहकार विभागाकडून केली जाते.

(३) आरोग्य, गृहनिर्माण व इतर योजना - मागास वर्गाची सहकारी गृहनिर्माण योजना. (डब्ल्यूआर - २१९).

(अ) मागास वर्गाच्या ज्या व्यक्तींचे दरमहा कौटुंबिक उत्पन्न महानगरपालिका क्षेत्रात रु. ६००, नगरपालिका क्षेत्रात रु. ५०० आणि ग्रामीण क्षेत्रात रु.४०० असेल अशा व्यक्ती या योजनेखाली आर्थिक सहाय्य दिले जाण्यास पात्र समजल्या जातात.

या योजनेखाली विभिन्न मागास वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना बिनव्याजी कर्ज व अर्थसहाय्य पुढील पध्दतीने दिले जाते.

| अ.क्र. | तपशिल | शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सहाय्याचे वर्गीकरण. | | |
|---|---|---|---|---|
| | | बिनव्याजी कर्ज | अर्थसहाय्य | वैयक्तिक अंशदान. |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | (ठाणे नगरपालिका क्षेत्रासह महानगरपालिका क्षेत्र) | | | |
| | (अ) अनुसूचित जाती, भटक्या व निम भटक्या जमाती व नवबौध्द. | ५० टक्के | २५ टक्के. | २५ टक्के. |
| | (ब) विदर्भाच्या विनिर्दिष्ट क्षेत्रा बाहेरील अनुसूचित जाती, विमुक्त जाती व जमाती. | ३७½ | ३७½ | २५ टक्के. |

पुढे चालू ...

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १) नगरपालिका क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र. (ठाणे नगरपालिका क्षेत्रासह) | | | | |
| | (अ) अनुसूचित जाती, भटक्या व निमभटक्या जमाती व नवबौध्द. | ६५ टक्के. | २५ टक्के. | १० टक्के. |
| | (ब) विदर्भाच्या विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेरील अनुसूचित जमाती विमुक्त जाती व जनजाती. | ५७½ | ३७½ | ५ टक्के. |

(ब) वरील सहाय्य प्रत्येक गाळ्याच्या बांधकाम खर्चावर असेल व त्यासाठी कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(१) नगरपालिका क्षेत्रात — रु. ५,०००/-

(२) महानगरपालिका क्षेत्रात — रु. ८,०००/- व

(३) इतर ठिकाणी. — रु. ४,०००/-

(क) मागासवर्गीय संस्थांमध्ये सामील होणाऱ्या मागासवर्गीयेतर १० टक्के सदस्यांना व मागासवर्गीयेतर संस्थांमध्ये सामील होणाऱ्या मागासवर्गीय सदस्यांना या योजनेखाली तेच लाभ देण्यांत येतील.

(ड) सरकारी जमीन उपलब्ध असल्यास विनामूल्य देण्यात येईल. सरकारी जमीन उपलब्ध न झाल्यास, खाजगी जमीन मिळविण्यांत येईल व दर चौरस यार्डाला रु. ५ या कमाल दराने त्याची किंमत शासनाकडून देण्यात येईल. जमिनीची किंमत या दरापेक्षा जास्त असल्यास ती तफावत त्या संस्थेकडून भरून काढण्यांत येईल.

(इ) नगरपालिका क्षेत्रामध्ये, जागेच्या विकासाकरिता बांधकामाच्या अंदाजित खर्चाच्या १५ टक्के इतके बिनव्याजी कर्ज देण्यांत येते.

(ई) या योजनेच्या जुन्या पध्दतीनुसार शासनाकडून या संस्थांना अनुदेय बिनव्याजी कर्ज देण्यांत येते, तर १ एप्रिल १९७१ पासून, शासनाच्या हमीवर महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्तसंस्था, मर्यादितकडून, तिच्या नवीन पध्दतीनुसार बांधकामाच्या खर्चाच्या ८० टक्के मर्यादेपर्यन्त कर्ज देण्यांत येते. या कर्जावरील व्याजाचा भार शासनाकडून वाहण्यांत येतो.

..२७

(फ) शक्य तेथे गृहनिर्माण मंडळाकडून किंवा संबंधित संस्थेकडून बांधकाम हाती घेण्यांत येते. हे कर्ज २० वर्षांच्या मुदतीत सारख्या तिमाही हप्त्यांमध्ये परतफेड योग्य असेल.

वैयक्तिक - गट गृहनिर्माण योजना :

या योजनेखाली रु. १,००० किंमतीच्या प्रत्येक घराकरिता रु. ७५० पेक्षा जास्त होणार नाही इतक्या रकमेचे अर्थसहाय्य, गरजू मागासवर्गीय भूमिहीन मजूरांना किंवा १/२ अेकरापेक्षा कमी जमीन धारण करणाऱ्या व्यक्तींना देण्यांत येते व त्या व्यक्तीने रोख रु. २५० किंवा तितक्या रकमेइतके शारीरिक श्रम या रूपात अंशदान करावयाचे असते. ग्रामीण क्षेत्रात १० टक्के मागासवर्गीयेतर व्यक्तिंचा समावेश असलेला ७ व्यक्तींचा गट या अर्थसहाय्यास पात्र असेल.

(२) आदिवासी कल्याण विभागाच्या योजना.

क्षेत्र विकास पध्दती - आश्रम शाळा केंद्र :-

अनुसूचित क्षेत्रांमध्ये, योजनांतर्गत कार्यक्रमाखाली यासाठी बरेच प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशी अेक बाब म्हणजे आदिवासींचे शिक्षण होय. राज्यातील क्षेत्र विकास पध्दती ही अनुसूचित व डोंगराळ क्षेत्रातील रहिवाश्यांच्या सामाजिक - शैक्षणिक प्रगतीस चालना देण्यासाठी व ती गतीमान करण्यासाठी राज्य शासनाने राज्यातील आदिवासींकरिता क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेतला होता. ही कार्यक्रमांखालील अेक मोठी योजना होती. ही योजना १९७२-७३ मध्ये सुरु करण्यांत आली. ५००० ते ७००० लोकवस्ती असलेल्या क्षेत्राचा या योजनेखाली समावेश करुन तेथील लोकांच्या सामाजिक व शैक्षणिक विकासाची गती वाढविण्यासाठी बहुविध कार्यक्रम सुरु करण्याचे शासनाने प्रथमत: योजिले होते. तथापि, प्रारंभी असा कार्यक्रम हाती घेण्यासाठी १०,००० लोकसंख्या असलेले क्षेत्र निवडण्यांत आले आणि त्यानंतर यापेक्षा कमी म्हणजे ५,००० लोकसंख्येपर्यन्तच्या क्षेत्राचा यामध्ये समावेश करण्याचे ठरविण्यात आले. या प्रयोजनार्थ निवडलेले व जेथे आश्रमशाळा उघडण्याचा विचार आहे, असे प्रत्येक सघन केंद्र हे केंद्रीभूत क्षेत्र असले पाहिजे. सघन क्षेत्राचा अंतिमत: विकास म्हणजे तेथे बालवाडी, कृषि प्रयोगनिर्देशन क्षेत्र , पशुसंवर्धन पथक, आरोग्य पथक, व त्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना, व्यक्तींना व त्या क्षेत्राला योग्य अशा व्यवसायाचे प्रशिक्षण देणारे व्यवसाय पूर्व प्रशिक्षण केंद्र यांची स्थापना करणे अशी या मागील मूळ कल्पना होती. त्यानंतर १९७३-७४ पासून सुरु करण्यांत आलेल्या सरकारी आश्रम शाळांमध्ये

..२८

फक्त आश्रम शाळा, बालवाडी व आश्रम शाळेला जोडलेले वसतिगृह अशा सारखे शैक्षणिक कार्यक्रम असावेत असे शासनाने ठरवले. तथापि, या वर्षांपूर्वी सुरु झालेल्या आश्रमशाळांमध्ये मात्र कार्यक्रमात मूलत: समाविष्ट केलेले सर्व कार्यक्रम असणे आवश्यक होते.

मार्च १९७८ अखेर आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत १६८ उपयोजना क्षेत्राच्या बाहेर ३८ अशा एकूण २०६ आश्रम शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. आश्रम शाळांना जोडूनच आदिवासी मुलांसाठी बालवाड्याही सुरु करण्यात आल्या आहेत. आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी मुलांची संख्या २० हजार व मुलींची संख्या ४,६०० येवढी आहे. बालवाडीचा लाभ घेणाऱ्या आदिवासी बालकांची संख्या ५५०० हून अधिक आहे. १८१ शासकीय आश्रमशाळांपैकी ४९ आश्रमशाळांमध्ये "कृषि प्रयोग निदर्शन केंद्र" २४ आश्रमशाळांमध्ये "दुग्धशाळा पशु संवर्धन युनिट" सुरु करण्यात आली आहेत. २० आश्रम शाळांच्या इमारती बांधून पूर्ण करण्यात आल्या आहेत. एकूण ८६ आश्रमशाळांना जमीन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. चालू वर्षी म्हणजे १९७८-७९ सालासाठी उपयोजना क्षेत्रात नवीन २५ शासकीय आश्रमशाळांना मंजुरी देण्यात आली आहे.

<u>स्वयंस्फूर्त संस्थांनी चालविलेल्या आदिवासी आश्रमशाळांना सहाय्यक अनुदान :-</u>

हा शैक्षणिक कार्यक्रम बऱ्याच कालावधीपासून अंमलात येत असून तो शिक्षण संचालनालयातर्फे राबविण्यात येत होता. १९७५ यावर्षी हा कार्यक्रम १४७ आश्रम शाळांसह व ३१ माध्यमिक आश्रमशाळांसह आदिवासी विकास संचालनालय, पुणे यांचेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.

ह्या आश्रमशाळा स्वयंस्फूर्त संस्थांमार्फत चालविल्या जातात. ह्या संस्थांना अभिकरणांना १९५५ मध्ये मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदान नियमानुसार अनुदाने दिली जातात. स्वेच्छा अभिकरणे, त्यांना शासनाकडून मिळालेल्या अनुदानांच्या आधारे आणि कांही प्रकरणी आपल्या स्वत:च्या साधनसंपत्तीच्या आधारे उपयोजना क्षेत्रांच्या अंतर्गत भागातल्या शाळा चालवीत आहेत. या कार्यक्रमाखाली प्रामुख्याने शिक्षण विषयक कार्ये हाती घेतली आहेत. उदाहरणार्थ आश्रमशाळा व त्यांच्याशी संलग्न असलेली वसतिगृहे. कांही शाळांमध्ये शेतजमीन संपादित केली असेल तर त्यांच्या उत्पन्नाला हातभार लागावा म्हणून आणि प्रौढ विद्यार्थ्यांना शेतीचे प्रशिक्षण द्यावे म्हणून या जमिनीत लागवडही केली जाते.

आदिवासी जमातीतील मुले व मुली यांच्याकरिता सरकारी वसतिगृहे :-

आदिवासी जमातींकरिता वसतिगृह योजना प्रथमत: समाज कल्याण संचालनाल्यामार्फत राबविली जात होती. १९७५-७६ या वर्षात ६ आदिवासी वसतिगृहे (मुलींकरिता) आदिवासी कल्याण संचालनाल्याकडे हस्तांतरित करण्यांत आली. याच्या जोडीला १९७६-७७ या वर्षात नंदुरबार येथील आदिवासी जमातींतील मुलांकरिता असणाऱ्या अेका वसतिगृहाला मंजूरी देण्यांत येअून ते या विभागामार्फत चालवले जाते. याशिवाय, हा कार्यक्रम सातत्याने चालणारा असल्यामुळे अनुसूचित जमातीतील मुले व मुली या दोन्ही विद्यार्थ्यांकरिता, मागासवर्गी वसतिगृहांच्या नांवाखाली अुपयोजना क्षेत्रांमध्ये २२ वसतिगृहे अुघडण्यांत आली आहेत आणि ती समाजकल्याण संचालनाल्यामार्फत चालविली जात आहेत.

आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अर्थसहाय्याच्या तत्वावर विद्युत पंपसंच पुरवणे :-

अनुसूचित जमाती डोंगराळ व दुर्गम क्षेत्रात रहातात व शेती हेच त्यांच्या अुपजीवीकेचे मुख्य साधन असते हे सर्व विदितच आहे पण ते ज्या क्षेत्रांमध्ये रहातात, तेथे त्यांना पाटबंधाऱ्याच्या सोयी अुपलब्ध नसलेल्या जमिनीवरच अवलंबून रहावे लागते. अशा परिस्थितीत त्यांना त्यांच्या शेतीवर वर्षातील जेमतेम कांही महिनेच निर्वाह करता येतो. म्हणून ज्या आदिवासी शेतकऱ्याकडे २।।ते १६ अेकरापर्यन्त स्वत:ची जमीन आहे व त्या जमीनी जवळील विहीरी, ओढा इ. मध्ये बाराही महिने पुरेसे पाणी आहे अशा आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी जलसिंचनाखाली आणण्याच्या दृष्टिने १०० टक्के अर्थसहाय्याच्या तत्वावर विद्युत पंपसंच पुरवण्याच्या योजनेला मंजुरी देण्याचे शासनाने ठरवले आहे. ज्या विहिरीतून किंवा जलाशयातून पाणी काढले जाअून ते संबंधित लाभाधिकाऱ्यांच्या प्रयोजनासाठी पुरवता येईल अशा विहिरींवर व जलाशयांवर हे पंपसंच बसवावयाचे आहेत. याप्रमाणे हा अनुसूचित जमातींकरिता आर्थिक विकास कार्यक्रम आहे.

आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अर्थसहाय्याच्या तत्वावर पंपसंचासहित तेल इंजिने पुरवणे :-

महाराष्ट्र राज्य वीज मंडळामार्फत जनजाती क्षेत्राचे विद्युतीकरण करण्याचा कार्यक्रम शासनाने आखला आहे. हा कार्यक्रम जनजाती क्षेत्रात सतत विस्तार पावत असला तरीही विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे हा कार्यक्रम

जनजाती क्षेत्रातील सर्व भागापर्यन्त पोहोचण्यास कांही वर्षे लागतील. याप्रमाणे जनजाती क्षेत्रातील कांही क्षेत्रामध्ये संपूर्णतया विद्युतीकरण होण्यास ३ ते ५ वर्षांचा काळ लागेल. दरम्यानच्या काळात जेथे स्वत:च्या जमिनीमध्ये किंवा जवळपास पाणी - पुरवठा असणाऱ्या २½ ते १६ अेकरापर्यन्त जमिनी असणाऱ्या अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आहेत तेथे त्यांना प्रत्येक इंजिनाला ४००० रु. इतक्या अंदाजे किंमतीचे तेल इंजिने पुरवून पाटबंधाऱ्यांच्या सोयी निर्माण करण्यासाठी सहाय्य दिले पाहिजे म्हणून शासनाने १९७६-७७ मध्ये योजनेला मंजुरी दिली आणि पंपसंचासहित १९७७-७८ अखेर २३२ तेल इंजिनांचा पुरवठा करण्यांत आला. १९७९-८० या वर्षांत २११ तेल इंजिनांचा पुरवठा करण्याचे ठरले आहे.

-o-

## (३) आदिवासी उपयोजना व आदिवासी सहकारी विकास महामंडळांतर्गत विकासाची योजना :-

### आदिवासी उपयोजनेंतर्गत विकासाचे कार्यक्रम :-

आदिवासींची आर्थिक व सामाजिक परिस्थिती लक्षांत घेऊन व गेल्या ४-५ योजनांच्या कार्याचा अनुभव लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकारनें आदिवासी विकासासाठी ऐकात्मक्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब करुन "आदिवासी उपयोजना" त्यार करण्याचे मार्गदर्शन राज्य शासनाला दिलेले त्यानुसार १३ जिल्ह्याती ४८ तालुक्यातील ६४२६ गावाचा उपयोजनेत समावेश केला आहे. (ठाणे, कुलाबा, नासिक, धुळे, जळगांव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर) या योजनेची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(अ) सर्व थरावर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे व त्याकरिता प्रभावी योजना आखणें.

(ब) समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आदिवासी समाज अलग पडला आहे. त्याला मुख्य प्रवाहांत समाविष्ट करणे, त्याकरिता दळणवळणाची साधनें वाढविणें, शैक्षणिक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादन पध्दतीची माहिती करुन देणें.

(क) आदिवासींमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे. त्यावर होणारा अन्याय व शोषण ह्यामुळे त्यांच्या जीवनांत उदासिनता आहे, ती दूर करण्यासाठी आदिवासी तरुणांना व त्यांच्यातील नव्या नेतृत्वाला स्वत:चा विकास स्वत: करण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे.

(ड) तोट्यांत जाणारी आदिवासींची शेती किफायतशीर होऊ शकेल अशी उपाययोजना करणे व त्या योगे आदिवासींचे जीवनमान सुधारणे.

(इ) आदिवासी विभागांत शेती व्यवसायाला पूरक धंद्याचा अभाव आहे, तो दूर करणें.

(ई) आदिवासींना लागणारा कर्ज, पैसा, सहकारी पध्दतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थांचे जाळे पसरुन त्याव्दारा पत पुरवठा करणे. आदिवासींच्या शेती मालाला योग्य भाव मिळून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.

ही उद्दीष्टें उपयोजनेत स्पष्टपणे मांडण्यांत आलेली आहेत. ती साध्य करण्यासाठी उपयोजना क्षेत्राचे अंमलबजावणीसाठी (१) सह्याद्री विभाग, व (२) गोंडवन विभाग असे दोन विभाग करण्यांत आले आहेत. या विभागाच्या कारभारासाठी दोन वेगवेगळे सहआयुक्त नागपूर व नाशिक येथे नेमण्यांत आलेले

आहेत. त्यांच्या कार्यक्षेत्रांत कलेक्टर आदिवासी उपआयुक्त व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी (आदिवासी)( सह उपआयुक्त) व प्रकल्प अधिकारी अशी यंत्रणा उभारण्यांत आलेली आहे. उपयोजनांतर्गत कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी व निरीक्षणासाठी त्यांना अधिकार देण्यांत आले आहेत. आदिवासी सहकारी सोसायट्यांच्या कार्यक्षमतेसाठी आदिवासी कमिशनरांना सहकार आयुक्तांचा दर्जा देण्यांत आला आहे.

जिल्हा परिषदेच्या पातळीवर स्पेशल अेक्झिक्युटिव्ह कमिटी फॉर ट्रायबल सब प्लॅन" अशा नांवाची समिती आहे. जिल्हा उपयोजना क्षेत्राचे विकास कार्यक्रम ठरविण्याचे अधिकार या समितीला आहेत. ही कमिटी आदिवासी प्रतिनिधींची आहे. आदिवासी आमदार तिचा उपाध्यक्ष असतो.

महाराष्ट्र राज्याच्या उपयोजना व अतिरिक्त उपयोजना क्षेत्रांत १२ जिल्ह्यांतील ४८ तालुक्यांचा समावेश करण्यांत आला आहे. त्यापैकी १५ तालुके पूर्णतः व ३३ तालुक्यांचा काही भाग उपयोजनेत समाविष्ट केलेला आहे. मध्यवर्ती शासनाने मान्य केलेल्या उपयोजना क्षेत्रांत ४० तालुक्यांमधील ५०२८ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्याशिवाय अतिरिक्त उपयोजना क्षेत्रांत ८ तालुक्यांतील १२९८ गावांचा समावेश केलेला आहे. म्हणजे अेकूण ६४२६ गावे उपयोजना व अतिरिक्त उपयोजना क्षेत्रांत समाविष्ट झालेली आहेत. त्या क्षेत्राचे अेकूण १६ प्रकल्प करण्यांत आलेले आहेत व त्यासाठी स्वतंत्र प्रकल्पाधिकारीही नेमण्यांत आलेले आहेत. त्याची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| धुळे | २ | चंद्रपूर | ३ | पुणे | १ |
| नागपूर भंडारा | १ | ---- | | नाशिक | २ |
| यवतमाळ | १ | अहमदनगर | १ | ठाणे | २ |
| अमरावती | १ | जळगांव | १ | नांदेड | १ |

त्याशिवाय प्राचीन वन्य जमातींच्या विकासासाठी स्वतंत्र प्रकल्प अधिकारी को नेमण्यांत आला आहे. अेकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ६६ टक्के आदिवासी व लोकसंख्या उपयोजना क्षेत्रांत समाविष्ट करण्यांत आलेली आहे. म्हणजेच सुमारे २० ते २५ लाख आदिवासींना या योजनेचा लाभ मिळेल. उपयोजनेसाठी १३० कोटी रुपयाची तरतूद करण्यांत आली होती त्यापैकी ११९ कोटी रुपये महाराष्ट्र शासनाचे व ११ कोटी रुपये मध्यवर्ती शासनाचे असतील. योजनेतर्गत राज्य पातळीवरील योजना" जिल्हा पातळीवरील योजना व मध्यवर्ती शासनाच्या सहाय्याने कार्यवाही होणाऱ्या

योजना" असे भाग करण्यांत आले आहेत. उपयोजनेत लघु व मध्यम पाटबंधारे, शेती सहकार, वीज, रोड रस्ते, शिक्षण, आरोग्य, दुग्ध विकास, ह्या बाबींवर अधिक भर देण्यांत आला आहे.

शासनाने असे ठरविले आहे कीं आदिवासी उपयोजनेसाठी करावयाचे वाटप फक्त उपयोजना क्षेत्रातील कार्यक्रमासाठीच राखून ठेवण्यांत यावे मात्र इतर कुठल्याही दुसऱ्या कार्यक्रमासाठी त्याचा वापर करण्यांत येवू नये. एखाद्या ठराविक वर्षी खर्चात तूट आल्यास ती योजना कालावधीच्या पुढील वर्षांत भरुन काढता येईल. यासाठी खात्रीची उपाययोजना म्हणून १९७६-७७ ह्या वर्षापासून प्रत्येक शीर्षाखाली "जनजाती क्षेत्र उपयोजना" हे वेगळे गौण शीर्ष सुरु करण्यांत आले आहे. अनुदानावर शासनाचे सचिव व आयुक्त आदिवासी विकास यांचे नियंत्रण राहील.

आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा १९७६. :-

आदिवासी क्षेत्रातील लोकांची सामाजिक व आर्थिक प्रगतीची अस्तित्वात असलेली पातळी व पूर्वी केल्या गेलेल्या प्रगतीशील प्रयत्नांच्या परिणामांचा अनुभव लक्षात घेता, आदिवासी जमातीतील लोकांचे जीवनमान सुधारुन आदिवासी व इतर क्षेत्रातील प्रगतीच्या स्तरांतील अंतर कमी कमी करणे हे आदिवासी उपयोजनेचे उद्दीष्ट्य आहे. आदिवासी उपयोजना तयार करुन राज्य शासनाने महाराष्ट्रांतील १३ जिल्ह्यांतील आदिवासींच्या प्रगतीची गती वाढविण्याचे मोठे पाऊल उचलले आहे. सावकारी व सौदा करणाऱ्या अस्तित्वात असलेले पिळवणूक करणाऱ्या प्रथा दूर करण्यासाठी, शासनाने, "महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा, १९७६" हा एक व्यापक स्वरुपाचा कायदा अधिनियमित केला आहे. या कायद्यान्वये, सर्वत्र आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासींना भूतपूर्व ऋणातून मुक्त करण्यांत आले. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सावकार व व्यापारी यांना दूर केल्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी बहु-उद्देशीय आदिवासी सहकारी सोसायट्यांची स्थापना करण्याचे प्रास्ताविक केले आहे. पांचव्या पंचवार्षिक योजनेचे काळांत २६१ आदिवासी सहकारी सोसायट्या चालू करण्याचे ठरले होते. आता पर्यन्त २५० आदिवासी सहकारी सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या आहेत व त्यांचे कामकाज सुरु झाले आहे. त्यापैकी १९३५ आदिवासी सहकारी सोसायट्यांनी महामंडळाचे सदस्यत्व स्विकारले आहे.

आदिवासींची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी, शासनाने आदिवासी जिल्ह्यांतील ७ तालुक्यांमध्ये विनिर्दिष्ट अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांची अेकाधिकार खरेदी योजना प्रस्तुत केली आहे. वर उल्लेख केलेल्या कायद्याखाली, आदिवासी उपयोजना क्षेत्रांत अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांच्या अेकाधिकार खरेदीसाठी, आदिवासी विकास महामंडळ शासनाचा मुख्य अेजंट म्हणून काम करित आहे. या महामंडळाने ३१ जुलै १९७९ पर्यन्त अेकूण रु. ७.७१ कोटी किंमतीच्या ६.८८ लाख क्विंटल विनिर्दिष्ट वस्तुंची खरेदी केली आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी शासनाने १४ इंटीग्रेटेड डेव्हलपमेंट प्रोजेक्टरसाठी १४ प्रकल्प अधिकारी व भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांतील अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी दोन प्रकल्प अधिकारी नियुक्त केले आहेत. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजना व प्रकल्प शासनाच्या संबंधीत कार्यात्मक विभागांकडून राबविल्या जातात. निरनिराळ्या विभागांची कार्ये कालबध्द व योजनाभिमुख कार्यक्रमांत समन्वित करुन त्यांचा हेतू साध्य करण्याला प्रकल्प अधिकारी जबाबदार असतात.

१९७८-७९ साली आदिवासी उपयोजनेकरिता केंद्र सरकारने रुपये ३.९७ कोटी स्पेशल सेंट्रल असिस्टंटसची उपलब्धता दर्शविली होती. १९७८-७९ साली आदिवासी उपयोजनेखालील कार्यक्रमासाठी रुपये ३.९७ कोटीची स्पेशल सेंट्रल असिस्टंस धरुन रुपये ४९.४८ कोटीचा व्यय राज्य शासनाने प्रस्तावित केला होता.

## आदिवासी विकास महामंडळ :-

आदिवासी विकास महामंडळ हे आदिवासी जमातींचा आर्थिक विकास निश्चित करण्याच्या दृष्टिकोनातून स्थापन करण्यांत आले आहे. वरील प्रयोजना साठी त्वरित निर्णय घेण्याच्या पुरेशा शक्ती असलेले हे अेक "स्वतंत्र मंडळ" आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० या अन्वये पुणे येथे मुख्यालय असलेली सर्वसाधारण संस्था म्हणून नोंदवण्यात आलेले हे नोंदणीकृत मंडळ आहे. महामंडळाच्या शासनासाठी अेक संचालक मंडळ असून त्याचे सभापती समाजकल्याण मंत्री आहेत. समाज कल्याण व आदिवासी कल्याण राज्य मंत्री हे उपसभापती आहेत. व्यवस्थापक मंडळ हे पदसिध्द सदस्य सचिव आहेत. स्वत:ची

प्राथमिक पथके उघडून आदिवासींच्या अर्थव्यवस्थेमध्ये मूलभूत बदल घडवून आणणे हा महामंडळाच्या कार्यक्रमाचा उद्देश आहे. महामंडळाची ७१ प्राथमिक पथके ४० तालुका शाखा कार्यालये व ७ प्रादेशिक कार्यालये आहेत. त्यांच्यामार्फत ते वरील कार्यक्रम पार पाडते. याशिवाय, ठाणे जिल्ह्यात वैरण पिकवणे गवत खरेदी करणे यासारखे महत्त्वाकांक्षी कार्यक्रम महामंडळाने सुरू केले आहेत. तसेच या विभागाकडून देण्यात आलेल्या ९० टक्के सहाय्यक अनुदानाच्या आधारावरील आदिवासी क्षेत्रातील ४८ आश्रम शाळाही हे महामंडळ चालवते.

खावटी कर्ज योजना :-

अलिकडेच शासनाने जनजाती जिल्ह्यातील ४० तालुक्यांमध्ये विनिर्दिष्ट अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांची "एकाधिकार खरेदी" योजना सुरू करण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे शासनाने उक्त क्षेत्रातील आदिवासींना खावटी कर्ज" (उपभोग्य भांडवल)" देण्याचे ठरविले. हे उपभोग्य भांडवल सर्व आदिवासी तसेच भूमिहिन व थकबाकीदारांना ७० टक्के मालाच्या रूपात व ३० टक्के रोख स्वरूपांत देण्यांत येते.

आदिवासी महामंडळाने आदिवासी सहकारी सोसायट्यांच्या मार्फत १९७८-७९, १.७६ कोटीहून अधिक खावटी कर्जाचे वाटप ४० तालुक्यांत केले. सुमारे १.६० लाख आदिवासी कुटुंबांना ह्यामुळे योजनेचा फायदा मिळाला आहे. खावटी कर्जासाठी "लहान खातेदार", थकबाकीदार शेतकरी, भूमिहीन मजूर" ह्या सर्वांचा विचार करून त्यांना लाभ देण्यांत आला आहे. भूमिहीन मजुरांना व अल्पभूधारकांना या योजनेमुळे लाभ झाला आहे. या योजनेमुळे सावकारापासून त्यांना दूर ठेवण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. शेतकऱ्याला २५० रू. थकबाकीदार शेतकऱ्याला १२५ रू. व भूमिहिन मजुराला १०० रू. या प्रमाणांत कर्जाचे वाटप झाले आहे. त्यापैकी साधारणपणे ७० टक्के रक्कम धान्यरूपाने व ३० टक्के रक्कम रोख देण्यांत आली आहे. आदिवासी सहकारी संस्था, प्रकल्पअधिकारी यांच्या सहाय्याने या योजनेची अंमलबजावणी करण्यांत आली. सुगीत "एकाधिकार" धान्य खरेदीचे वेळी ह्या कर्जाची वसुली करण्यांत येते. भूमिहिन शेतमजुराचे कर्ज रोजगार हमीच्या मजुरीतून सुलभ हप्त्याने वसूल केले जाते. १९७८-७९ मध्ये वाटलेल्या खावटी कर्जापैकी ५० लाख खावटी कर्ज त्याच वर्षीच्या सुगीच्या हंगामात एकाधिकार धान्य खरेदीचे [illegible] वसूल झाले.

## (४) सरकारी बांधकाम व गृहनिर्माण विभागाच्या योजना.

### गृहनिर्माण योजना :-

मागासवर्गीय समाजाला गृहनिर्माणासाठी सहाय्य देऊन हा विभाग त्यांना मदत करीत असतो. सहाय्य देऊन पुढील योजना कार्यान्वित केल्या जातात.

### (१) वन गृहनिर्माण योजना :

ही योजना १९७१-७२ पासूनच सुरु झाली. या योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) फक्त वनग्रामात राहाणाऱ्या व्यक्तींनाच या योजनेखाली वित्त सहाय्य देण्यांत येईल.

(२) प्रत्येक घरामागील कमाल खर्च रु. २,००० इतका आहे. वनग्रामांत राहाणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या व्यक्तींकरिता सहाय्य देण्याची पध्दत पुढीलप्रमाणे असेल.

| प्रवर्ग | बिनव्याजी कर्ज. | अर्थ सहाय्य | वैयक्तिक अंशदान |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | (टक्केवारी) | (टक्केवारी) | (टक्केवारी) |
| (अ) अनुसूचित जाती, नवबौध्द, भटक्या व अर्धभटक्या जमाती. | ५० | २५ | २५ |
| (ब) विदर्भाच्या विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती, विमुक्त जाती आणि जमाती. | ३७ १/२ | ३७ १/२ | २५ |
| (क) मागासेतर जाती व इतर मागास वर्ग | ७५ | काही नाही. | २५ |

घरबांधणीच्या रु. २,००० या रकमेचे पुढीलप्रमाणे नियत वाटप करण्यात आले.

(अ) प्रत्येक घरामागे २० टक्के म्हणजे रु. ४०० इमारती लाकूड, बांबू, व इतर वन उत्पादने वन विभागाकडून विनामूल्य पुरविण्यांत येतील.

(ब) ५ टक्के म्हणजे रु. १०० - वनग्रामातील रहिवाशांकडून, अंगमेहनतीव्दार व्यक्तीगत अंशदान.

(क) ७५ टक्के म्हणजे रु. १,५०० वन संरक्षकांनी उपलब्ध करुन द्यावयाचे अर्थसहाय्य व कर्ज.

जरी बांधकामाचा खर्च रु. २००० पेक्षा अधिक होऊ द्यावयाचा नसला तरी, वन संरक्षकांना कोणत्याही गांवक-यांना मंजूर रकमेच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही एवढा अतिरिक्त खर्च मंजूर करण्याच्या शक्ती प्रदान करण्यांत आल्या आहेत.

२० वार्षिक हप्त्यात या कर्जाची परतफेड करावयाची आहे. पहिला वार्षिक हप्ता शक्यतो दरवर्षाच्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये वसूल करण्यांत यावा.

हे कर्ज बिनव्याजी असेल. तथापि, हप्त्याची परतफेड करण्यामध्ये कसूर करण्याची प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी नियत दिनांकापासून हप्ता देण्याच्या दिनांकापर्यंन्त सर्व देय हप्त्यांवर दरसाल १० टक्के या दंडार्थ दराने व्याज (चक्रवाढ व्याज) आकारण्यांत येईल.

या योजनेचा लाभ घेणा-या प्रत्येक व्यक्तीला विहित करार करावा लागेल.

मागासेतर वर्गातील किंवा इतर मागासवर्गातील १० टक्के व्यक्ती ५० टक्के बिनव्याजी कर्ज, २५ टक्के अर्थसहाय्य व २५ टक्के वैयक्तिक अंशदान याप्रमाणे सहाय्य मिळण्यास पात्र राहतील, मात्र त्यांनी अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जमातींच्या व्यक्तींच्या वसाहतीतच आपली घरे बांधली पाहिजेत. यामध्ये मागासेतर वर्गातील व्यक्तींना प्राधान्य देण्यांत येत आहे. मागासेतर व्यक्तींची उत्पन्नाची मर्यादा दरसाल १,२०० रुपये आहे.

बांधकाम हाती घेण्यापूर्वी, प्रत्येक गांवक-याची, तो घर बांधण्यास तयार आहे आणि त्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास व इतर शर्तींचे पालन करण्यास तयार आहे अशा अर्थाची संमती विहित नमुन्यामध्ये घेणे आवश्यक आहे. बांधकामासाठी आवश्यक असणारी रक्कम, वन प्रक्षेत्र अधिका-याकडून नेहमीप्रमाणे वन आगाऊ रक्कम म्हणून धनादेशाव्दारे मागणी करून मिळविता येईल. झालेला खर्च, प्रक्षेत्र लेख्यांमध्ये "निलंबन लेखा" या शीर्षाखाली आकारण्यांत येतो.

प्रत्येक गांवक-याने केलेल्या वैयक्तिक मजुरीच्या स्वरूपातील अंशदानाच्या बाबतीत योजनेमध्ये विहित केल्याप्रमाणे प्रत्येक गांवक-याने रु. १०० पर्यंन्त अंशदान होईपर्यंन्त त्याने केलेल्या मजुरीचा एक स्वतंत्र हजेरीपट किंवा प्रमाणक ठेवावे. या बाबतीत प्रत्यक्ष रक्कम द्यावयाची नसल्यामुळे हे रोख लेख्यामध्ये येणार नाही. तथापि अशा प्रमाणकांवर सही घेण्यांत यावी.

वन प्रक्षेत्र अधिकारी, प्रत्येक गांवक-यांच्या बाबतीत केलेल्या खर्चाचा गोषवारा विहित नमुन्यात तयार करील आणि त्याच्या मासिक हिशोबासह तो विभागीय वन अधिका-याला सादर करील.

वन प्रक्षेत्र कार्यालयात तसेच विभागीय, वन नियमपुस्तिका खंड अेकच्या अनुच्छेद २४६ अनुसार बांधकामाच्या नोंदवहीमध्ये बांधकामावर झालेल्या खर्चाची नोंद करण्यांत येईल. बांधकाम पूर्ण होईल तेंव्हा वन अुत्पादनाची व मजूरीच्या रुपाने केलेल्या अंशदानाची किंमत विचारात घेऊन बांधकामाचा अेकूण खर्च काढण्यांत येईल.

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मुख्य वन संरक्षकाकडे विनियोगासाठी निधी पुरे करण्यांत आल्यावर विभागीय वन अधिकारी त्याच्या लेख्यामध्ये अर्थ सहाय्य व कर्ज यांचे समायोजन करील. हा व्यवहार विभागीय रोख पुस्तकात येईल.

कोणत्याही खेडुतास मजूरकाम करणे शक्य नसेल किंवा त्याचे काम कमी पडत असेल तर त्या मजूरकामाइतकीच रक्कम त्याला दिलेले कर्ज म्हणून समजण्यांत येईल आणि त्यानुसार, त्याची वसुली करण्यांत येईल.

महसूल व वन विभागाने ग्रामीण भूमिहीन मजुरांसाठी मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेल्या अल्प किंमतीच्या लहान झोपड्या बांधण्याच्या कार्यक्रमासाठी हा निधी वापरल्यामुळे १९७५-७६ मध्ये या योजनेकरिता केलेली तरतूद शासनाकडे परत करण्यांत आली होती.

..२९

## (५) शिक्षण व युवक सेवा विभागाच्या योजना.

१. आठवी व नववीच्या वर्गांना पुस्तकपेढीची योजना लागू करणे :

प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या बरीच मोठी असली तरीही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व समाजातील इतर दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मात्र लक्षणीय वाढ झालेली नाही. इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गातील २५ टक्के विद्यार्थ्यांकरिता (ह्या दुर्बल घटकांतील) स्थानिक संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक शाळांमध्ये १९७६-७७ मध्ये पुस्तक पेढी योजना सुरू करण्यात आली आहे. १९७७-७८ च्या अखेरीस सातव्या इयत्तेत विद्यार्थ्यांना या योजनेत सामावून घेण्यात आले आणि १९७८-७९ मध्ये राज्यातील प्राप्तानुदान माध्यमिक शाळेतील आठवी ते नववी इयत्तांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हा कार्यक्रम लागू करण्यात आला आहे. १९७९-८० मध्ये राज्यातील प्राप्तानुदान माध्यमिक शाळातील दहावीच्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू करण्याचे प्रस्तावित केले आहे. १९७९-८० साठी या योजने अंतर्गत ३९.९४ लाख रु. खर्चाची तरतूद केली आहे.

२. ठाणे जिल्ह्यात केंद्र शाळा स्थापन करणे :

१९७७-७८ या वर्षी ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी क्षेत्रात वाघाडी येथे वसतिगृहाची सोय असलेली केंद्र प्राथमिक शाळा उघडण्यात आली आहे आणि १९७९-८० या वर्षी ही सोय पुढे चालू ठेवण्याचे योजिले आहे.

३. चंद्रपूर जिल्ह्यातील अहेरी ऐटापल्ली येथील गट निवासी शाळा :

१९७७-७८ या वर्षी चंद्रपूर जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रातील ऐटापल्ली गटातील गटनिवासी शाळा उघडण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. या निवासी शाळा असून त्या केवळ आदिवासींतील विद्यार्थ्यांसाठी आहेत. १९७९-८० या वर्षी या प्रयोजनाकरिता ७.५० लाख रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

४. अनुसूचित व डोंगराळ क्षेत्रातील प्राथमिक शिक्षकांसाठी निवासगृहाचे बांधकाम :

राज्याच्या अनुसूचित व डोंगराळ भागात काम करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांसाठी निवासगृहांची तरतूद करणे हे योजनेचे उद्दिष्ट आहे. ज्या

भागांत त्यांना नियुक्त करण्यांत येते त्या भागात योग्य अशी निवासस्थाने उपलब्ध नसल्याकारणाने त्या भागात काम करणारे शिक्षक या भागात काम करण्यास नाखुश असतात. या योजनेखाली संबंधित जिल्हा परिषदांना प्रत्येक निवासगृहामागे रु. १०,००० इतक्या रकमेचे संपूर्ण अनुदान देण्यांत येते.

५. अनुसूचित जाती अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विशेष सुविधा :

प्राथमिक शाळांतील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी समाजाच्या या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना विशेष सुविधा देण्याची अेक योजना १९७७-७८ मध्ये सुरु करण्यांत आली. या योजनेखाली प्राथमिक शाळांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाट्या, पुस्तके व गणवेश इ. देण्यांत येतात. प्रत्येक विद्यार्थ्यास दोन गणवेश संच व लेखन सामग्री देण्यांत येते. प्रत्येक विद्यार्थ्यामागे गणवेशावर ५० रु. व लेखन सामग्रीवर १० रु. खर्च करण्याचे प्रास्तावित केले आहे. या योजनेखाली अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळण्याच्या दृष्टिने १९७९-८० मध्ये या प्रयोजनासाठी रु. ९९.६८ लाख इतकी रक्कम प्रस्तावित केली आहे. आदिवासींमधील बुध्दीमान विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांची गुणवत्ता वाढविण्याची "खास शिष्यवृत्ती" देण्याचीही योजना कार्यान्वीत करण्यांत येते.

६. खेळातून शिक्षण देणारी केंद्र :

आदिवासी मुलांना शिक्षणाची गोडी लावावी, शाळेत येण्यास त्याला आकर्षण निर्माण व्हावे यासाठी शाळांना जोडूनच खेळातून शिक्षण देणारी केंद्रे ( Play and learn Centres ) उघडण्याची योजना लहानमुलांसाठी राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत ठाणे, नांदेड, धुळे, अमरावती, चंद्रपूर जिल्ह्यांत अशी केंद्रे उघडण्याची सोय करण्यांत आली आहे.

७. विद्याश्रम सेवा :

खास आदिवासी विभागांत इयत्ता १ ते ७वी पर्यन्त आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण घेणाऱ्याही सुविधा निर्माण करण्यांत आली आहे. पूर्व प्राथमिक विभाग हा विद्याश्रमाला जोडण्यांत येतात. विद्याश्रमामध्ये विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणाची व शालेय साहित्य मोफत पुरविण्याची सोय आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण वाढविण्यासाठी विद्याश्रमामध्ये विशेष लक्ष देण्यांत येते. १९७९-८० मध्ये धुळे जिल्ह्यांत २ व नाशिक जिल्ह्यांत १ विद्याश्रमे उघडण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

..

## कृषि व सहकार विभागाच्या योजना

या विभागाशी संबंधित योजना व त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) मागास वर्गाच्या औद्योगिक सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य :

औद्योगिक सहकारी संस्थांच्या सर्वसाधारण योजनांनुसार या संस्था पुढीलप्रमाणे आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र ठरतात.

(अ) भाग भांडवलात १:३ या प्रमाणात शासकीय अंशदान.
(ब) रु. ६०० चे व्यवस्थापन अर्थसहाय्य.
(क) गोदामे बांधण्यासाठी हत्यारे व साधनसामग्री यांच्या खरेदीसाठी कर्ज व अर्थसहाय्य.
(ड) शेअर खरेदी करण्यासाठी सभासदांना कर्ज.
(ई) मध्यवर्ती वित्तव्यवस्था संस्थांकडून व्याजाच्या सवलतीच्या दराने खेळत्या भांडवलासाठी कर्ज आणि
(फ) गोदामे बांधण्यासाठी कर्ज व अर्थसहाय्य.

याशिवाय मागास वर्गाचा औद्योगिक सहकारी संस्थांना पुढील प्रमाणे जादा सहाय्य मिळते.

(१) शासकीय भाग भांडवली अंशदान रु. २,०००.
(२) तीन वर्षापर्यन्त व्यवस्थापन अर्थसहाय्य रु. ६००
(३) मागास वर्गाच्या अनुसूचित जाती व जमातींच्या संमिश्र सहकारी संस्थांचे शेअर खरेदी करण्यासाठी कर्ज : मागास वर्गाच्या लोकांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांच्या शेअर खरेदीसाठी या योजनेखाली व्यक्तींना कर्ज मंजूर करण्यात येते.

(२) अन्य सुविधा :-

शेती विभागामार्फत दुबार पिके घेण्यासाठी नागलीचे अधिक उत्पन्न काढण्यासाठी, ज्वारीचे अधिक उत्पादन काढण्यासाठी, बैलगाडी घेण्यासाठी, फळझाडे लावण्यासाठी, नगदी पिके घेण्यासाठी, शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी, दुभती जनावरे पुरविण्याची अशा अनेक योजना "कांही कर्ज काही सूट" या पध्दतीने खात्यामार्फत व जिल्हा परिषदांमार्फत राबविल्या जातात. सहकारी खाते आदिवासी सहकारी संस्थांच्या मार्फत आदिवासींना कर्ज पुरविण्याचे व त्यांच्या नित्याच्या गरजा पुरविण्याचे काम करतात.

..४२

(ई) महसूल व वनविभाग.

१. आदिवासींच्या हस्तांतरित जमीनी परत मिळवून देणारे कायदे :

आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतर थांबविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने खालील कायदे पास केले आहेत.

(१) महाराष्ट्र जमीन महसूल कोड आणि कुळकायदा. (सुधारित) १९७४.

(२)

(१) महाराष्ट्र जमीन महसूल कोड आणि कुळकायदा (सुध ित), हा कायदा ६ जुलै १९७४ पासून लागू झाला आहे. या कायद्यान्वये आदिवासींच्या जमिनींच्या होणाऱ्या हस्तांतरावर बंधने घालण्यात आली आहेत. ६ जुलै १९७४ पूर्वी बेकायदेशीर रित्या हस्तांतरीत झालेल्या आदिवासींच्या जमिनी परत आदिवासींना मिळवून देण्याची व्यवस्था या कायद्यात करण्यांत आलेली आहे. या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून २८ फेब्रु.७९ पर्यंत १४७७० प्रकरणे रजिस्टर्ड झाली आहेत. त्यापैकी (१४२०१) प्रकरणांची प्राथमिक छाननी झाली आहे. त्यापैकी (६२६७) प्रकरणे निकालांत काढून (१३०७६) हेक्टर जमिन आदिवासींना देण्याचे आदेश झाले आहेत. यापैकी (४०९६) आदिवासींच्या ताब्यात (१०२७९) हेक्टर जमीन देण्यांत आलेली आहे. (२½ अकर म्हणजे अेक हेक्टर)

(२) दुसऱ्या कायद्याअन्वये १ अेप्रिल १९५७ ते ६ जुलै, १९७४ या कालावधीत हस्तांतरित झालेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून २८ फेब्रु. १९७९ पर्यंत अेकूण (३१४०४) प्रकरणे रजिस्टर्ड झाली. यापैकी (२३१२४) प्रकरणांची प्राथमिक छाननी होअून त्यातून (१३४८) प्रकरणे अंतिम निकाली निघाली आहेत. त्यामुळे (१११८५) आदिवासींना (२०१०४) हेक्टर जमीन मिळणार असे आदेश झाले आहेत. यापैकी प्रत्यक्षात (५११२) आदिवासींना (८५८३) हेक्टर जमिनीचा ताबा मिळाला आहे.

२. गावठाण उपलब्ध करून देण्याच्या दोन योजनांतर्गत योजना असून त्या पुढीलप्रमाणे आहेत.

(१) दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणांना गावठाण देणे आणि,

(२) भटक्या जमातीव भूतपूर्व गुन्हेगार जमाती व मागासलेले समाज यांचे पुनर्वसन करणे, या दोन योजनांसाठी १९७९-८० च्या अर्थसंकल्पांत रु. ३५.२० लाख ची अेकत्रित तरतूद करण्यांत आली असून त्यापैकी रु. ३.२० लाख अेवढी रक्कम भटक्या जमाती व मागासलेल्या समाज यांच्या पुनर्वसनासाठी राखून ठेवण्यांत आली आहे.

/ ४३

## (अ) अन्य सुविधा, आणि विकासाच्या योजना:

### (१) शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश :

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळणे सुलभ जावे म्हणून शासनाने त्यांच्याकरिता पुढीलप्रमाणे राखीव जागांचे प्रमाण ठरवून दिले आहे.

(१) अनुसूचित जाती (नवबौध्दांसह) - १३ प्रतिशत.
(२) अनुसूचित जमाती - ७ प्रतिशत.
(३) विमुक्त जाती आणि भटक्या जमाती - ४ प्रतिशत.
(४) इतर मागासवर्गीय जाती. - १० प्रतिशत.

उपरोक्त राखीव प्रमाण शासकीय शैक्षणिक संस्थांना बंधनकारक आहे तसेच अशासकीय संस्थामध्येही हे प्रमाण राखले जावे अशी शासनाची अपेक्षा आहे.

### (२) जंगल कामगार सहकारी सोसायट्या :

जंगल कामगार सोसायट्या करण्यामागे मुख्य उद्देश म्हणजे जंगलतोडीच्या कामातून कंत्राटदार व बिगर आदिवासी यांचे उच्चाटन करणे हा होय.

जंगल कामगार सहकारी संस्थांना पुढील प्रमाणात मदत मिळते.

(१) संस्थेच्या पहिल्या वर्षात ३,००० रुपये भाग भांडवलाची गुंतवणूक.
(२) पहिली दोन वर्षे १२०० रुपये दरसाल व्यवस्थापनाच्या खर्चासाठी मदत.
(३) पहिली तीन वर्षे कल्याण कार्याकरिता दरसाल रुपये १५०० ची मदत.

जंगल कामगारांच्या सहकारी संस्थेची संघटना : जंगल कामगार संस्थांचे मुल्यमापन करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशीवरून शासनाने अशा संस्थांची संघटना प्रत्येक जंगल विभागाकरिता स्थापन करण्याचे ठरविले. प्रत्येक संघटनेसाठी जिल्हा सहकारी अधिकाऱ्याच्या दर्जाचा अेक अधिकारी शासनातर्फे पाठविला जातो व त्याच्या वेतनावर येणारा खर्चही पहिली दोन वर्षे शासनच करते.

जंगल कामगार सहकारी संस्थाचे कार्य कार्यक्षमतेने व सुरळीतपणे चालविण्यासाठी त्यांचे चिटणीस, हिशेबनीस, मुकादम, अेजंट, डेपो कारकून

इत्यादि नोकरवर्ग प्रशिक्षित असणे आवश्यक आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थातर्फे मध्यवर्ती प्रशिक्षण शाळा, नासिक येथे १९६३-६४ साली सुरु करण्यांत आली. या प्रशिक्षणाचा जंगल सहकारी संस्थांच्या आदिवासी कामगारांना चांगला उपयोग होत आहे.

(३) मागासवर्गीय उमेदवारांना सवलती :

भारतीय घटनेच्या संविधान अनुच्छेद १६(२) अन्वये कोणाही नागरिकाला जात, धर्म, पंथभेद वगैरे कारणास्तव नोकऱ्या नाकारता येत नाहीत व सर्वांना नोकऱ्यांमध्ये समान संधी देण्यात यावी. अशी तरतूद आहे. तथापि मागासवर्गीयांना कुठल्याही सेवा क्षेत्रात अजूनही पुरेसा वाव मिळत नाही. ही परिस्थिती सुधारुन मागासवर्गीयांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने शासनाने त्यांना पुढील सवलती दिल्या आहेत.

(अ) शासकीय नोकऱ्यांमध्ये त्यांच्यासाठी पुढीलप्रमाणे जागा राखून ठेवण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| (१) अनुसूचित जाती व धर्मांतरित (अनुसूचित जातीतील) नवबौध्द. | - | १३ टक्के. |
| (२) अनुसूचित जमाती व निर्धारित क्षेत्राबाहेर राहाणारे आदिवासी (विदर्भ विभागातील) | - | ७ टक्के. |
| (३) विमुक्त जाती व भटक्या जमाती. | - | ४ टक्के. |
| (४) इतर मागासवर्ग | - | १० टक्के. |

(ब) अनुसूचित जमातींची लोकसंख्या जास्त असल्यास या टक्केवारीनुसार या लोकांना नोकऱ्यांत योग्य प्रतिनिधीत्व मिळत नाही. अशा परिस्थितीत पुढील जिल्ह्यांत स्थानिक नोकऱ्यांमध्ये त्यांच्यासाठी अधिक जागा राखून ठेवण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| ठाणे, नासिक, व धुळे | - | २२ टक्के. |
| चंद्रपूर | - | १५ टक्के. |
| यवतमाळ | - | १४ टक्के. |
| कुलाबा | - | ९ टक्के. |

(क) नोकरीत घेताना मागासवर्गीयांच्या बाबतीत वयोमर्यादेची अट इतरांपेक्षा ५ वर्षांनी शिथिल करण्यांत येते.

..४५

(ड) राखीव जागेवर त्यांना नोकऱ्या उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्येक शासकीय कार्यालयातून विहित तक्त्यांत नियुक्ती रजिस्टर ठेवण्यांत येते. जर एखाद्या जागेसाठी लायक उमेदवार उपलब्ध होऊ शकला नाही तर ती जागा किमान ५ वर्षांपर्यन्त तरी रिकामी ठेवावी व त्यानंतर अशा रिक्त जागा व नवीन राखीव जागा यांच्यासाठी भरती व्हावे असे आदेश देण्यांत आले आहेत.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या कर्मचाऱ्यांसाठी अनुक्रमे १२ टक्के, ७ टक्के, व ४ टक्के या प्रमाणांत बढतीच्या जागा राखून ठेवण्यांत येतात.

वरील सर्व सवलती उपलब्ध असूनसुद्धा मागासवर्गीयांचे नोकऱ्यातील प्रमाण समाधानकारक नसते. म्हणून कोणत्याही खात्यात शासकीय सेवेत नोकरभरती करताना समाजकल्याण विभागातील अधिकारी निवड समितीत उपस्थित राहून निवड योग्य होते किंवा नाही हे पाहतो. शिवाय प्रत्येक खात्यात निर्धारित जागा मागासवर्गीयांना मिळतात किंवा नाही हे पाहण्यासाठी समाजकल्याण संचालक हे समन्वय अधिकारी म्हणून काम करतात.

या सर्व सवलती शासकीय सेवेपुरत्याच मर्यादित नसून महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, शासन पुरस्कृत महामंडळेसुध्दा मागासवर्गीयांना या सवलती देऊन भरती करून घेतात. त्याखेरीज सर्व सहकारी संस्था, सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने व शासनाचे अनुदान मिळणाऱ्या सर्व खाजगी संस्थांनी चालविलेल्या शिक्षण आदि संस्थामध्येही मागासवर्गीयांसाठी जागा राखून ठेवण्याच्या दृष्टिने आवश्यक ती उपाययोजना करण्याचे आदेश देण्यांत आले आहेत. अशा रितीने मागासवर्गीयांना नोकऱ्यांत व बढत्यांत न्याय्य वाटा मिळावा म्हणून शासन प्रयत्नशील आहे.

(४) अनुसूचित जमाती (आदिवासी) कल्याण सल्लागार समिती :

भारतीय घटनेच्या पाचव्या परिशिष्टातील तरतुदीनुसार ही समिती स्थापन करण्यांत आली असून राज्याचे मुख्यमंत्री हे तिचे अध्यक्ष आहेत. या समितीच्या कमीतकमी ३ बैठका दरवर्षी होतात. आदिवासी कल्याणकारी कार्याबाबत ही समिती शासनाला वेळोवेळी मार्गदर्शन करते. समाज कल्याण मंत्री हे या समितीचे उपाध्यक्ष आहेत. सदस्यांपैकी ११२ सदस्य किंवा १५ सदस्य आदिवासी मतदार संघातून निवडून आलेल्या प्रतिनिधीपैकी असतात.

..४६

(५) महाराष्ट्र विधान मंडळाची अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणार्थ नेमण्यांत आलेली समिति :

अनुसूचित जाती व जमाती यांच्या आयुक्तांनी आपल्या वार्षिक अहवालांत केलेल्या निरनिराळ्या शिफारसी संबंधात शासनाने केलेल्या कार्याचा आढावा घेणे व कार्यवाहीचा पाठपुरावा करणे, हे या समितीचे प्रमुख कार्य. या व्यतिरिक्त हरिजनांवरील अत्याचार व अन्याय थांबविण्याच्या दृष्टिने जरूर ती उपाययोजना सुचविण्यासाठी जिल्हानिहाय दक्षता समित्यांची देखिल स्थापना करण्यांत आली आहे. या दक्षता समित्यांमुळे हरिजनांवरील अत्याचार वगैरे प्रकारांना आळा बसला आहे.

(६) महाराष्ट्र विधान सभेची अनुसूचित जमाती कल्याण समिती :

या समितीची रचना १७ ऑगस्ट १९७५ च्या आदेशान्वये करण्यांत आलेली आहे. या समितीत एकूण १६ आदिवासी सभासद आहेत. या १६ आदिवासी आमदारांपैकी एक सदस्य या समितीचे अध्यक्ष आहेत. आदिवासी कल्याण योजना निरनिराळ्या शासकीय विभागामार्फत कशा रितीने राबविल्या जातात हे पहाणे व यातील उणीवा दूर करण्यासाठी मार्गदर्शन करणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे.

(७) आदिवासी युवक नेतृत्व प्रशिक्षण सत्र। विस्तार अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण। अशासकिय सेवाभावी व्यक्तिसाठी प्रशिक्षण :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणेमार्फत वरील प्रकारची प्रशिक्षण सत्रे पुणे येथे व निरनिराळ्या जिल्ह्यातील आदिवासी विभागांत आयोजित केली जातात. आदिवासी विकास कार्याला अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने ही प्रशिक्षण सत्रे चालविली जातात. प्रशिक्षणार्थींना सत्राचे वेळी येण्याजाण्याचा प्रवासखर्च व दैनिक भत्ता देण्यात येतो.

(८) आदिवासी समस्या बाबत व योजनांचे मुल्यांकन करणेकरिता संशोधन शिष्यवृत्ती व निर्वाहभत्ता :

आदिवासी समस्याबाबत व योजनांच्या मुल्यांकनाचे संशोधन करण्यासाठी संशोधकांना संस्थेमार्फत शिष्यवृत्ती देण्यांत येते, शिष्यवृत्तीचा काल २ वर्षांचा असतो.

..४७

## योजनेच्या लाभासाठी संपर्क कुठे साधावा.

| योजनेचे नांव | योजनेच्या माहितीसाठी कोणत्या अधिका-याशी संपर्क साधावा व कुठे ? |
|---|---|
| **शिक्षण :-** | |
| १) शासकिय वसतिगृहात प्रवेश मिळवणे. | विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे मुंबई, औरंगाबाद व नागपूर विभाग व वसतिगृहाचे अधिक्षक.<br>वृत्तपत्रातून जाहिरात आल्यावर छापील नमुन्यात विशिष्ट मुदतीत विद्यार्थ्याने अर्ज करावयाचा असतो. |
| २) भारत सरकारच्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या (कॉलेज विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या) | (अ) पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर जिल्ह्यासाठी विभागीय समाज कल्याण अधिकारी व<br>(ब) अन्य जिल्ह्यासाठी - समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.<br>ह्या शिष्यवृत्त्यांसाठी कॉलेज मार्फत छापील नमुन्यात व विशिष्ट मुदतीत अर्ज करावयाचा असतो. |
| ३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन (शिष्यवृत्त्या) | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद प्रशिक्षण संस्थेमार्फत विशिष्ट नमुन्यात अर्ज करावयाचा असतो. |
| ४) विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, वैद्यकिय विद्यार्थ्यांना सहाय्य. | संचालक, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे १०. |

..२

| १ | २ |
|---|---|
| ५) शिक्षण फी, परीक्षा फी व अन्य शिष्यवृत्त्या | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| ६) वसतिगृहांसाठी स्वयंस्फूर्त संस्थांना वित्तिय सहाय्य (ग्रॅन्ट अिन अेड) | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| ७) गट निवासी केंद्रशाळा व विद्याश्रम मध्ये प्रवेश. | गट निवासी केंद्र शाळेच्या प्रवेशासाठी शिक्षणाधिकारी व विद्याश्रमाच्या प्रवेशासाठी संबंधित जिल्ह्याच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. |
| ८) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाटया, पुस्तके, गणवेष, लेखन साहित्य, अित्यादी. | जिल्हा परिषदेच्या शाळातील पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी या सवलती आहेत व प्राथमिक शाळाच्या. |
| ९) शासकिय आश्रमशालेत प्रवेश [illegible] मिळवणे. | आदिवासी कल्याण अधिकारी व शाळाप्रमुख. शाळा सुरु होण्यापूर्वी अर्ज करणे जरुरीचे आहे. |
| १०) आदिवासी भागातील व अन्य आय.टी.आय.मध्ये प्रवेश | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जाहिर केलेल्या मुदतीत अर्ज करावा लागतो. |
| ११) आदिवासींकरिता शासकीय वसतिगृहा सुरु करणे. | संचालक, आदिवासी कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| १२) शासकीय व खाजगी आश्रमशाळा सुधारणे (विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रमशाळासह) | संचालक, आदिवासी कल्याण विभाग, म.रा. पुणे, संचालक समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. |

| १ | २ |
|---|---|
| १३) स्वयंस्फूर्त आश्रमशाळांना अनुदान देणे (विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रमशाळासह) | संचालक, आदिवासी कल्याण विभाग, संचालक, समाज कल्याण विभाग, म.रा. पुणे. |
| १४) सैनिकी शाळांमध्ये प्रवेश मिळवणे फी माफी व शिष्यवृत्ती मिळवणे. | प्राचार्य, सैनिकी शाळा, सातारा, पुणे, नाशिक प्रवेशानंतर प्राचार्यांच्या मार्फत शिष्यवृत्ती व फी माफीसाठी समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद व विभागिय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करावयाचा असतो. |
| १५) आदिवासी विकास महामंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा मध्ये प्रवेश. | प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, पुणे, यवतमाळ, नाशिक, नंदुरबार, ठाणे, नागपूर, चंद्रपूर व आश्रम-शाळा प्रमुख अगर व्यवस्थापक. |
| १६) मागासवर्गीय मुलांसाठी बालवाड्या सुरु करणे. | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद गट विकास अधिकारी, पंचायत समिती. |
| १७) मोटारगाडी चालनाचे प्रशिक्षण | संचालक, समाज कल्याण विभाग, म.रा.पुणे. |
| १८) नोकरीसाठी स्वतंत्र नांव नोंदणी | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, संचालक, समाज कल्याण विभाग, म.रा.पुणे. |
| १९) शैक्षणिक संस्थांमध्ये मागास - वर्गीयांना प्रवेशाचा हक्क. | संचालक, समाज कल्याण विभाग, म.रा. पुणे विभागीय समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |

..५०

| १ | २ |
|---|---|
| **आर्थिक अुन्नती :** | |
| २०) विद्युत पंप संच पुरविणे (फक्त आदिवासींसाठी) | आदिवासी कल्याण अधिकारी (जिल्हा) |
| २१) तेल अिंजिनाचा संच पुरवणे (फक्त आदिवासींसाठी) | आदिवासी कल्याण अधिकारी (जिल्हा) |
| २२) खावटी कर्ज पुरवठा करणे | आदिवासी सहकारी सोसायटी व आदिवासी विकास महामंडळाचे स्थानिक कार्यालय. |
| २३) जोडव्यवसाय व अुद्योगधंदे | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| २४) जमिनीच्या बांधबंदिस्तीसाठी | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| २५) विहिरी व अवजारे यांचेसाठी मदत. | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| २६) गोबरगॅस युनिट | खादी ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा शाखा. |
| २७) अधिक अुत्पादन देणाऱ्या पिकाच्या बी बियाणाच्या खताचा व जंतु नाशकाचा पुरवठा व शेती अुत्पादना- विषयी अन्य सवलती. | गट विकास अधिकारी पंचायत समिती, शेती विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शेती अधिकारी, जिल्हा परिषद. |
| २८) शेतीसाठी व दुभति जनावरे घेण्यासाठी कर्ज पुरवठा, अनुदान व सूट. | आदिवासी सहकारी सोसायटी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थानिक किंवा जवळची शाखा. |

| १ | २ |
| --- | --- |
| २९) छोटे व मध्यम उद्योगधंदे काढण्यासाठी सवलतीच्या दराने कर्ज व मदत. | महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई. |
| ३०) अविकसीत ग्रामीण क्षेत्रात तेल-इंजिन विकत घेण्यासाठी कर्ज वा अनुदान. | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. गट विकास अधिकारी, पंचायत समिती. |

गृहनिर्माण

| १ | २ |
| --- | --- |
| ३१) अनुसूचित जाती जमातींकरिता सहकारी गृह निर्माण. | विभागीय समाज कल्याण अधिकारी,पुणे. औरंगाबाद, नागपूर, मुंबई. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| ३२) वैयक्तिक व गट गृह निर्माण योजना. | समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद. |
| ३३) वनगृह निर्माण योजना (जंगलवासिय आदिवासींसाठी) | रेंजर अधिकारी । वन अधिकारी (विभाग व जिल्ह्याचे) |
| ३४) गृहनिर्माण मंडळाच्या गाळ्यामध्ये मागासवर्गीयांना राखीव गाळे (शहरी विभागासाठी) | गृहनिर्माण मंडळाचे कार्यालय अशा गाळ्यासंबंधी अगावू जाहिरात येते. ठराविक छापील नमुन्यात अर्ज करावा. लागतो. |

वन विभाग

| १ | २ |
| --- | --- |
| ३५) जंगल कामगार सहकारी संस्थांना मदत, अनुदान व सहाय्य. | असिस्टन्ट रजिस्ट्रार फॉर को-ऑपरेटिव्ह व वनाधिकारी (जिल्ह्याचा अगर स्थानिक विभागाचा). |
| ३६) जंगल विषयक विशेष सवलती व फायदे. | रेंज फॉरेस्ट अधिकारी व वन अधिकारी (स्थानिक विभागातील) प्रत्येक जिल्ह्यातील वन विभागातील सवलती व फायदे निरनिराळी आहेत. |

..५२

| १ | २ |
| --- | --- |
| **प्रासंगिक योजना.** | |
| ३७) आदिवासी युवक प्रशिक्षण सत्रामध्ये प्रवेश. | संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, राणीचा बाग, म.रा.पुणे १. |
| ३८) आदिवासी संस्कृति, प्रश्न याचे संशोधन किंवा योजनांचे मूल्यमापन करण्याकरिता संशोधन शिष्यवृत्ती व निर्वाह भत्ता (प्रतिवर्षी दोन) | संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर अर्ज करावा. |

## अनुसूचित जमाती (१३-२-१९७८ पासून)

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश सुधारणा कायदा १९७६ (१९७६ चा १०८ वा) मधील परिशिष्ट १ मधील भाग९ मध्ये नमूद केल्याप्रमाणें.

-०-

१. आंध.
२. बैगा.
३. बरडा.
४. बावचा, बामचा.
५. भैना.
६. भारिया, भूमिया, भुइनआर, भूमिया, पांडो.
७. भात्रा.
८. भिल्ल, भिल गरासिआ, ढोली, भिल
डुंगरी भिल, डुंगरी गरासिया, मेवासी भिल,
रावल भिल, तडवी भिल, भगालिया, भिलाला,
पावरा, वसावा, वसावे.
९. भुंजिया.
१०. बिंझवार.
११. बिरहुल, बिरहोर.
१२. चौधरा (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद, व परभणी जिल्हे सोडून)
१३. ढाणका, तडवी, तेतरिया, वळवी.
१४. धनवार.
१५. धोडिया.
१६. दुबळा, तलाविया, हळपति.
१७. गामित, गामटा, गावित, मावची, पाडवी.
१८. गोंड किंवा राजगोंड.
आरख, अराख, अगारिया, असूर, बडीमारिया, बडामारिया,
भाटोला, भिम्मा, भुता, कोइलाभुता, कोइलाभुती, भार, बिजन हॉर्न मारिया,
छोटा मारिया, दंडामी मारिया, धुरु, धुरवा, धोबा, धुलिया, डोरला,
गायकी, गट्टा, गट्टी, गायता, गोंड गोवारी, हिल मारिया, कांदरा, कलंगा.

खटोला, कोयतार, कोया, खिरवार, खिरवारा, कुच मारिया, कुचकी-मारिया, माडिया, मारिया, माना, मन्नेवार, मोघ्या, मोग्गिया, मोंघ्या, मुडिया, मुरिया, नागरची, नाइकपोड, नागवंशी, ओझा, राज, सोनझारी, झरेका, धाटिया, थोट्या, बाडेमारिया, बडेमारिया.

१९. हलबा, हलबी.

२०. कमार.

२१. काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी.

२२. क्वर, कोंवर, कौर, चेरवा.

२३. खैरवार.

२४. खारिया.

२५. कोकणा, कुकणी, कुकना.

२६. कोल.

२७. कोलाम, मुन्नेरवारलु.

२८. कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा.

२९. महादेव कोळी, डोंगरकोळी.

३०. कोळी मल्हार.

३१. कोंध, खोंड, कांध.

३२. कोरकू, बोपची, मोवासी, निहाल, नहुल, बोंधी, बोंडेया.

३३. कोया, भिन्नेकोया, राजकोया.

३४. नगेसिया, नगासिया.

३५. नाइकडा, नायका, मोटा नायका.

[illegible] नाना नायका, कापडिया नायका, चोळीवाला नायका.

३६. ओरांव, धनगड.

३७. परधान, पाथरी, सरोटी.

३८. पारधी, आडवी चिंचेर, फांसे पारधी, फांसेपारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहेल्लिया, चिता पारधी, शिकारी, टाकणकर, टाकिया.

३९. परजा.

४०. पटेलिया.

४१. पोम्ला.

४२. राठवा.

४३. सवर, सवरा.

४४. ठाकूर, ठाकर, का-ठाकूर, का-ठाकर.
मा-ठाकुर, मा-ठाकर.

४५. थोटी (औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी
जिल्ह्यांत व चंद्रपूर जिल्ह्याच्या राजुरा तहसीलमध्ये)

४६. वारली.

४७. विटोलिया, कोटवालिया, बारोडिया.

-०-